१९६५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ९२-५०

REFBK-0014483

' गणेशोऽवतु सर्वेषां सर्वतश्चाः सुसिद्धिदः '

॥ श्री ॥

# अंकुश.

' येन संहरसि ब्रह्मन् त्वद्भक्तार्ति गणेश्वर ।
स तु सुकृतिनां पाता दीर्घस्ते अस्तु अंकुशः ॥१॥ '

' भगवान् विष्णु '

वर्ष १ ] फाल्गुन—चैत्र. यो. शाके ३४४. [ अंक २-३

REFBK-0014483

पद—( चाल—रामस्मरावा )

गाई मयुरानाथ ॥ मानवा ॥
गाई मयुरानाथ ॥ धृ० ॥
करातटाकीं भूस्वानन्दीं,
रमला जो श्रुतितात ॥ १ ॥
यन्नाभिज विधि, हरि वदनोद्भव,
त्र्यंबक अंबकजात ॥ २ ॥
वामपार्श्वगा श्री जगदम्बा,
दक्षज तो दिननाथ ॥ ३ ॥
पंचवरद हें नाम धरी जो,
करुनि तयांसि कृतार्थ ॥ ४ ॥
अंकुशधारींचा हा केवळ,
प्राणसखा परमार्थ ॥ ५ ॥
मानवा ॥ गाई मयुरानाथ ॥

## श्रीगुरु-वन्दन.

### पद.

गुरुपद तेंचि खरें ॥ गतिप्रद ॥
गुरुपद तेंचि खरें ॥ धृ० ॥
वर्णाश्रमपालन पूर्णत्वें ॥
ज्ञान जिथें विवरे ॥ १ ॥
शास्त्रेतर पाखण्डें खण्डुनि, ॥
आचार्यत्व खरें ॥ २ ॥
भक्ति विरागादिक अति सोज्वळ, ।
वाक् सत्या विखरें ॥ ३ ॥
दंभ असूया लोभेर्ष्यादिक-॥
जेथें लेश नुरे ॥ ४ ॥
यद्धवसंगें सत्पथ दिसुनी ॥
ये गुरुता मनिं रे ॥ ५ ॥
सहज भाषणें अधिकारापरि ॥
सर्वां ज्ञान स्फुरें ॥६॥
अंकुशधारी त्यापरि धुंडुनि
शांतिवनीं विचरें ॥ ७ ॥

श्रीगाणेश जद्गुरु-श्रीब्रह्मभूयपीठाधीश्वर,

'श्रीमद्गणेशयोगीन्द्राचार्य महाराजा-'

विजयन्ते !

---

# गाणेश जगद्गुरु श्रीमद्गणेशयोगीन्द्र विजय-संग्रह.
( गुरुचतुष्टयासह. )

## श्रीयोगीन्द्राचार्य.

" ज्ञानं विना नैव मुक्तिस्तज्ज्ञानं गुरुभक्तितः ॥
" तस्माद्गुरुं प्रपद्येत कायेन मनसा गिरा ॥ १ ॥

कोणतेंहीं कार्य,—त्याचें सांगोपांग संपूर्ण ज्ञान असल्यावांचून सिद्ध होत नाहीं; म्हणजे कारणानुरूप फलकारक होत नाहीं, आणि तें ज्ञान कोणा तरी तज्ज्ञ मार्गदर्शकावांचून प्राप्त होत नाहीं असा सामान्य परंतु अगदीं निरपवाद नियम आहे. याकरितां तशा मार्गदर्शकाचें अर्थात गुरूचें महत्व सर्वत्र सांगितलेलें असतें. सुखप्राप्तीकरितांच अहर्निश झटणाऱ्या सर्व जीवांना परमसुखरूप—चारही पुरुषार्थीमध्यें श्रेष्ठ असा एक मोक्षच आहे. व त्याच्या प्राप्तीचें कारण ज्ञान—आत्मज्ञान-हें—एकच-आहे असा सर्व शास्त्रांचा सिद्धान्त आहे. त्याचकरितां तज्ज्ञ अशा अधिकारी मार्गदर्शकाचें अर्थात् सद्गुरूचेंच आश्रयण सर्व प्रकारें करावें अशी शास्त्रांची व सत्पुरुषांची आज्ञा आहे. ' असो जयासी मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरूचीं करावा ' । ( श्रीदासबोध )

आज जो कांहीं गाणपतमार्ग रूढ आहे, अथवा जेवढे ह्मणून गणेशभक्तिमार्गी लोक आहेत, त्या सर्वांचें कारण व गुरुत्व ' **श्रीमद्गणेश योगीन्द्राचार्य** ' यांचेकडेच आहे. परंतु मोठ्या खेदाची व आश्चर्याची गोष्ट कीं, ज्यानीं बाल्यापासून सर्वस्वाचा त्याग करून गाणपदादिमार्गांचें संशोधन व स्थापन केलें, सर्वत्र दिग्विजय करून गाणपत गुरु पीठाचा उद्धार केला, किंबहुना गाणपेतर मार्गीय लोक ' एकदेशीय गाणपत ' असल्यामुळें सर्वच मार्गांचें ज्यांनीं यथाधिकार स्थापन केलें, आणि ह्मणूनच ज्यांची " जगद्गुरोर्गणेशस्य चक्रुराराधनं क्षितौ ॥ चातुर्वर्ण्यजनाः सर्वे गाणपत्यमतानुगाः." अशी यथार्थ प्रसिद्धि आहे, त्यांच्याविषयीं—त्यांनी स्थापित व उद्धृत केलेल्या मार्गांचेंच—अंशतः—कां होईना-पण-अनुकरण करणाऱ्या प्रस्तुतच्या गाणपत मार्गीयांना पूर्ण माहिती नाहीं! मग त्यांनीं उधृत केलेल्या श्रीपीठाविषयीं अगर

प्रवृत्त केलेल्या शुद्ध संप्रदायाविषयीं सादर अभिमान दिसून येत नसेल यांत नवल काय ? ही गोष्ट अत्यंत अनिष्ट आहे ! उलट-त्यांच्याविषयीं व त्या सांप्रदायाविषयीं पूर्ण ज्ञान करून घेऊन त्याचें अवलम्बन करणें हेंच अत्यंत इष्ट असून सर्वांचें परम कर्तव्य आहे.

यास्तव त्यांचें चरित्र व अद्वैत संप्रदायप्रवर्तक अशा इतर गुरुचतुष्टयाचें महत्व संक्षेपतः या अंकापासून देत आहोंत. ' श्रीमद्गणेश योगीन्द्राचार्य' महाराज यानां समाधिस्थ होऊन ११५वर्षें झाली असून, यांचा चालू अवतार शक ३४४ हा आहे. चिमणाजी आप्पा, थोरले माधवराव, अमृतराव, वगैरे पेशवे,मंडळींचे हे गुरु श्रीयोगीन्द्र महाराजच असल्याचे उल्लेख जुन्या कागदपत्रांतून सांपडतात. अस्तु !

( श्लोक--स्रग्धरा )

' आद्याचार्यो गुणेशो गणक इति तथा मुद्गलो योगिनाथो ॥
गाणेशो व्यासयोगी भृगुरपि गुरुराट् शंकरो लोकनाथः ॥
गाणेशेन्द्रो गणेशो मुनिवर गिरिजानन्दनः पीठनाथा ॥
आद्यन्तस्थस्वरूपा गुरुपदशरणान् योगसिद्धिं दिशन्तु ॥१ ॥ '

या जगतीतलावर संपूर्ण जनांच्या हिताकरितां परमेश्वरानें कर्म, उपासना, व ज्ञान एतद्रूप त्रिकांड वैदिकधर्म प्रवृत्त केला आहे. परंतु कालस्थिति सत्व-रज आणि तम-या त्रिगुणांनीं युक्त असल्यामुळें, तो जसा केला आहे, तसाच सर्वदा सर्वत्र तो प्रवृत्त असतोच असें मात्र नाहीं. युगमानाप्रमाणें वेळोवेळीं त्याची वृद्धि व ह्रास हीं होतच असतात. या नियमाप्रमाणें दुष्ट असुरादिकांकडून या धर्माचा नाश केला जाऊन, धर्मनिष्ठांना जेव्हां अत्यंत विघ्न होऊं लागते, तेव्हां त्यांचा नाश करून साधूंचें पालन करण्याकरितां नारायणादि ईश्वरांचें अवतार झाल्याचें व होत असल्याचें सर्व शास्त्रप्रसिद्धच आहे. हें जे अवतार धर्मरक्षणार्थ वेळोवेळीं झाल्याचें प्रसिद्ध आहे, ते सर्व प्रायः वैदिकधर्माच्या-केवळ कर्मकांडाचें-एकांगाचें रक्षण करण्याकरितांच झालेले असल्यामुळें, जीवांच्या परम कल्याणाच्या दृष्टीनें विचार केला तर हें धर्मरक्षण एकदेशीयच ठरतें. परमनिःश्रेयसकर कर्मोपासन ज्ञानात्मक सनातन वैदिक धर्माचें--अद्वैत सिद्धांताचें प्रस्थापन करणारे आचार्यांचे अवतारच वरील ईश्वरावतारांपेक्षां श्रेष्ठ होत यांत संशय नाहीं.

यांप्रमाणें अद्वैत संप्रदायप्रवर्तक आचार्यावतारांचें महत्व निर्विवाद सिद्ध आहे. अद्वैतावसानभूत—परमशांतिरूप—ब्रह्मभूयसिद्धि-ब्रह्मसायुज्य-सिद्धि मुमुक्षु जनांना यथाधिकार प्राप्त व्हावी म्हणून तत्साधनीभूत षण्मार्गांचें स्थापन व रक्षण करण्याकरितां कृतयुगापासून द्वापरांतापर्यंत शास्त्रनियमाप्रमाणें वेगवेगळे आचार्य अवतीर्ण होऊन स्वस्वासिद्धान्ताचें प्रवर्तन करित असतात. हें श्रुति-स्मृति-स्मृतिपुराण प्रसिद्ध आहे. लोकांत जे गुरु, परमगुरु, परात्परगुरु, आणि परमेष्ठीगुरु म्हणून प्रसिद्ध आहेत, तेच हे वारंवार अवतीर्ण होत असलेले आचार्य होत.

कृतादि तीनही युगांत जसें युगप्राधान्यानें यांचें अवतार होतात, तसेंच ते कलियुगांतही काळभेदानें ( कलियुगांत सर्व प्रकारचे अधि, कारी संभवत असल्यामुळें ) अवतीर्ण होत असल्याचें ब्रह्मांड, भविष्योत्तर, सौर, औशनस व सानत्कुमार इत्यादि पुराणांत व शिवरहस्य-ज्ञानामृतादि इतिहासांत भविष्यत्वानें कथन केलें आहे. व तें भविष्य त्या त्या काळीं भगवान् श्रीगौडपाद, श्रीमच्छंकराचार्य इत्यादि विभूति उत्पन्न होऊन, त्यांनीं अद्भुत कार्य केल्याचें सर्वांसच ज्ञात असल्यामुळें, खरेंच आहे यांत संशय नाहीं.

हे आचार्य पंचगुरु म्हणून प्रसिद्ध आहेत. पैकीं परंब्रह्मगुरु म्हणजे साक्षात् वेदपुरुष श्रीगणकाचार्य, परमेष्ठी गुरु श्रीमुद्गलाचार्य, परात्पर गुरु-श्रीव्यासोनारायण, परमगुरु-श्रीशुकाचार्य, आणि गुरु म्हणजे ब्रह्मर्षिश्रेष्ठ भृग्वाचार्य होत. यांचेच अवतार कलियुगांत अनुक्रमें श्रीगौडपाद, श्रीगणेशयोगीन्द्र, श्रीगिरिजासुत योगीन्द्र, श्रीभगवत्पाद-श्रीमच्छंकराचार्य, आणि श्रीब्रह्मानन्द योगीन्द्र असे झालेले असून, त्यांनींच भगवदाज्ञेनुरूप द्वैतखण्डनपूर्वक शुद्धाद्वैतसिद्धांत ( भिन्न भिन्न काळीं अधिकारानुरूप भिन्न भिन्न प्रकारें ) स्थापन केला आहे. असें असतां या पंचकांचें चरित्र, व ग्रंथ इत्यादिकांविषयीं यथार्थ ज्ञान सर्वत्र लुप्तप्राय झाल्यासारखें दिसतें ! हें कलिकालाचें भव्य गौरव होय ! ! त्यांतल्या त्यांत अशा दुर्धर स्थितींत सुद्धां अद्वैतप्रवर्तक कलियुगाचार्य श्रीमच्छंकरभगवत्पाद योगीन्द्र यांचें प्रस्थान व सिद्धान्त प्रचंड सूर्याप्रमाणें (किंचित् साभ्र) संपूर्ण भारतवर्षास प्रकाशवित आहे. हेंच आमच्या सनातन वैदिक धर्माच्या परम सत्यत्वाचें व दृढमूलत्वाचें मेरूप्रमाणें अचल प्रमाण होय.

वरील गुरुपंचकांपैकीं परमेष्ठी गुरु श्रीमन्मुद्गलावतार भगवान् 'श्रीमद्गणेशयोगीन्द्राचार्य,' ज्यांनीं या आमच्या महाराष्ट्रांत निवास करून, तत्कालीन अनेक विरुद्ध मार्गांचें खण्डन करून अद्वैतपरमकाष्ठाभूत-ब्रह्मभूयसिद्धिप्रद-असा पूर्णप्रणवात्मक-स्वानंदेशज्ञानोपास्तिबोधक गाणेशाद्वैतमार्ग स्थापन केला. आणि अधिकारी जनांचा उद्धार केला. त्यांचें योगीन्द्रचतुष्टयासह-संग्रह चरित्र-क्रमानें देत आहोंत.

( पंचगुरुमाहात्म्य. )

( श्लोक—शिखरिणी )

" गुरुर्ब्रह्मानंदः परमगुरुराट् शंकर यति-॥
स्तथा श्रीमद्गौरीतनय इति संज्ञः परपरः ॥
गणेशेन्द्रो योगी गदित-परमेष्ठि-गुरुवरः ॥
परंब्रह्माख्यः श्रीसकलगुरूराड् गौडचरणः ॥१॥ "

१ परंब्रह्मगुरु—श्रीगौडपाद योगीन्द्र.

भगवान् श्रीकृष्ण आपलें अवतारकृत्य संपवून वैकुंठीं गेल्यानंतर पुष्कळ कालानें श्रीवेदव्यासांनीं स्थापन केलेल्या अद्वैत प्रस्थानाचा व संप्रदायाचा लोप होऊन, पुनः 'धाता यथा पूर्वमकल्पयत्' या न्यायानें कलियुगप्रवृत्तीकरितां-पूर्व नियतीप्रमाणें युगस्थिति व्हावी म्हणून-श्रीविष्णूंनीं बौद्धरूपानें अवतीर्ण होऊन 'अनार्य षट्क' म्हणून प्रसिद्ध असलेलें, चार्वाक, जैनादि सहा प्रकारचें 'वर्णाश्रमविवर्जित' अतएव–वेद–गर्हित–असें–पाखंडमत सर्वत्र प्रवृत्त केलें! केवळ तमोमय अशा कलिकालाचें सहाय्य मिळाल्यामुळें मनुष्यमात्राच्या सहज प्रवृत्तीला अ सरून पूर्वस्थापित वैदिकधर्माचारमर्यादा क्रमानें शिथिल होऊन तेंच पाखण्ड मत झपाट्यानें वाढत गेलें! पुष्कळांच्या मनांत या ठिकाणीं साहजिकपणेंच अशी एक शंका उत्पन्न होते कीं, भगवान् वासुदेव हे श्रीगीतेंत जर

'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत'
'अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्'
'धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे'

अशी प्रतिज्ञा करीत आहेत, तर मग तेच अधर्मप्रवर्तक कसे होतील? तरी यासंबंधें शास्त्रांत असलेली धर्मपालनव्यवस्था लक्षांत घेतली असतां वरील शंकेचें समाधान होणें शक्य आहे. पूर्वीं नित्य नियमा-

प्रमाणें ब्रह्मदेवानें सृष्टी उत्पन्न केल्यानंतर तिच्या स्थितीला अवश्य असलेल्या कालाचें चिंतन करून, तो परमात्म्याचें ध्यान करूं लागला. तेव्हां त्या ध्यानाच्या योगानें कृतादि चार भेदांनीं युक्त असलेला युग—काल—पुरुष त्याच्यापासून उत्पन्न झाला, व आपलें कार्य काय ? वगैरे प्रश्न करूं लागला ! पुढें ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें कालजनक जो भगवान् गुणेश त्याची तपश्चर्या करून, त्याच्या आज्ञेनें व कृपाबलानें तो कालपुरुष आपल्या स्वभावानुरूप सर्व लोकांत विहार करूं लागला. जगताचें पालन करण्याचा श्रीविष्णूचा अधिकार असल्यामुळें, त्या त्या कालाची स्थिति पूर्णपणें व्हावी म्हणून त्या कालानां पोषक अशी स्थिति उत्पन्न करणें त्यांना अवश्य असते. म्हणून सत्वगुण-प्रधान कृतादि युगामध्यें ( तीं धर्मप्रधान असल्यामुळें ) त्या युगधर्मांचा नाश करणाऱ्या दैत्यादिकांचा नाश करून वैदिक—धर्म—मार्गांचें रक्षण त्यांनीं केलें. तसेंच कलियुग-धर्मस्थिति होण्याकरितां त्या धर्मास पोषक अशीं मतें अर्थातच प्रवृत्त केलीं. कारण युगधर्मांचें पालन हें त्यांचें एक नियत कर्तव्य आहे. तदनुसार त्यांनीं पाखंड-प्रवृत्ति केली, हेंही अनुरूपच आहे. अशी मुख्य व्यवस्था असून तिला पोषक अशीं—दक्षयज्ञ प्रसंगानें झालेले शाप वगैरे—कारणें पुराणांत प्रसिद्धच आहेत. अस्तु !

याप्रमाणें या अनित्य जगताच्या रक्षणाची जरी नित्य ( नेहमींची ) नियति आहे, तरी नित्य—परमशाश्वत असा जो धर्म-' सनातन वैदिक धर्म' तोच प्राणिमात्रांच्या उन्नतीला मुख्य कारण असल्यामुळें, आणि या नित्याभासरूप अनित्य जगच्चक्रांतून सुटून परम सुख प्राप्त करून घेणें, हेंच अंतिम साध्य असून, मनुष्यत्वाचें सार्थक्यही त्यांतच असल्यामुळें, त्या धर्माचें व धर्मनिष्ठांचें—युगमानाप्रमाणें वाढलेल्या आपत्तिफलक धर्माभासापासून-रक्षण करणें हें सर्व जगत्कारण सर्वेश्वर भक्तवत्सल स्वानन्देशाचें—बुद्धिपतीचें मुख्य कार्य आहे, म्हणून वेळोवेळीं त्याचें व त्याच्या आज्ञेनें शिवादिकांचे अंशानें व अंशांशानें अवतार झालेले आहेत. तस्मात् सदसद्विवेकबुद्धियुक्त जनांनीं कोणत्याही मोहाला वश न होतां, कालचक्रांतून सुटण्याकरितां परम धर्ममार्गाचेंच अवलं-

बन करावें. अशा तऱ्हेचें मार्गदर्शकत्व किंवा शासकत्व आचार्यांकडेच असल्यामुळें त्यांचें महत्व विशेष आहे.

मागें सांगितल्याप्रमाणें कलिधर्म-प्रसिद्धीकारितां, श्रीविष्णूनीं बौद्धमार्ग प्रवृत्त केल्यानंतर क्रमानें सर्वत्र वर्ण धर्मांचा लोप झाला ! मतधर्मविषयीं पूर्ण अश्रद्धा झाली ! आणि राजाश्रयानें वाढलेल्या त्या बौद्धांच्या सामर्थ्यामुळें, क्वचित् असलेल्या धर्मनिष्ठांचें जीवन अत्यंत धोक्याचें झालें !! इतकेंच काय पण अरण्यवासी धर्मपरायणांनां देखील कलिसहाय्ययुक्त बौद्धानें मोहित केलें !! मग सामान्य जनांची कथा काय ? " देह हाचि देव । भोजन ते भक्ति " अथवा 'यावज्जीवेत्सुखं जीवेत्दृणं कृत्वा घृतं पिबेत् ॥ भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः " इत्यादि तत्वें (?) त्यांना सहज पटूं लागली. याप्रमाणें सर्व लोक वेदमार्गापासून सर्वथा भ्रष्ट झाले असतां, पुनः धर्म-स्थापना करण्याकरितां भगवदाज्ञेनें कृतयुगाचार्य श्रीपरब्रह्मगुरु श्रीमद्गणकाचार्यांनीं ( तो कलियुगांतील कृतकालाचा संधि असल्यानें) कलियुगाची दोन हजार वर्षें गेलीं असतां पृथ्वीवर द्विजकुलामध्यें अवतार धारण केला. त्यांच्या पित्याचें नांव 'माधव' असें असून तो प्रतिष्ठान ( गया ) नगरांमध्यें राहत असे. यांचा अवतारकाल चैत्र शुक्ल द्वितीया गुरुवार रोहिणी नक्षत्र व धनुर्लग्न असा वर्णिला आहे.त्यांच्या अवतारकालीं दिव्यदृष्टी देवादिकांना मोठा आनन्द झाला. नंतर जातकर्मादि सर्व-संस्कार करून यथाकालीं माधव विप्रानें-विद्वान् व अधिकारी ब्राह्मणांच्या मतानें आपल्या मुलाचें नांव 'श्रीगौडपाद' असें ठेविलें.

श्री गौडपादांचे उपनयनादि संस्कार यथाकालीं होऊन, त्यांनीं ब्रह्मचर्याश्रमाचें अनुष्ठान यथाशास्त्र करून संपूर्ण वेदांचें व शास्त्रांचें अध्ययन केलें. श्री गौडपाद हे ' यस्य निःश्वसितं वेदा ' असें ज्या परमात्म्याचें वर्णन केलेलें आहे त्या वेदजनक श्रीगुणेशाच्याच अंशानें वृत्तकालाला अनुसरून धर्मस्थापनाकरितां अवतीर्ण झालेले असल्यामुळें त्यांचें वेदादिकांचें अध्ययन केवळ ' सकृच्छ्रवणमात्रतः ' झालेलें असल्यास त्यांत आश्चर्य कसलें ? अस्तु. याप्रमाणें ब्रह्मचर्याश्रमधर्मांचें पालन यथास्थित करून स्वतःच्या उदाहरणानें त्याची प्रवृत्ति केल्यानंतर यज्ञादिकांच्या अनुष्ठानानें कर्मकांडाची प्रवृत्ति करण्याकरितां ब्राह्मविवाह विधीनें त्यांनीं गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला.

श्री गौडपादांनीं स्वत: श्रौताग्निपरिग्रह—पूर्वक अत्यंत कर्मपरायण होऊन आपल्या दिव्य तेजानें व सोज्ज्वल आचारनिष्ठेनें सर्वत्र कर्मकांडाची यथा-पूर्व पूर्ण प्रवृत्ति केली, आणि शिष्यादि द्वारा सर्वत्र प्रचार करवून आणि नाना प्रकारच्या विरुद्ध कुतर्कांचें खण्डन करवून जनतेंत वैदिक धर्मश्रद्धा जागृत केली.

पूर्वी सांगितलेंच आहे कीं, सदसद्भेदरूप अथवा धर्माधर्ममिश्र जगत्स्थि-तीला मूळभूत असलेल्या काळाला अनुसरून, मिथ्याभासात्मक मायामोहाच्या योगानें अधर्माची व अधर्मरुचि अधर्मनिष्ठांची वृद्धि होते; आणि धर्माचें व धर्मनिष्ठांचें प्रवर्तन, रक्षण व वर्धन होणें, अत्यंत अवश्य असते; व त्याकरितां पंचधा स्थित असलेल्या जगदीश्वरालाच वेळोंवेळीं अवतीर्ण व्हावें लागतें. हें सर्व शास्त्रप्रसिद्धही आहेच. पंचसमष्टिरूप किंबहुना पंचभेदशून्य जें सर्व कारण परब्रह्म तें स्वमहिम्निस्थ स्वयंज्योति:स्वरूप असल्याचें श्रुतींनीं सांगि-तलें आहे. त्यालाच स्वमहिम्निस्थित असल्यामुळें 'स्वानंदेश' व केवळ गज म्हणजे निर्गुणस्वरूप असल्यामुळें 'गजानन'–अशी संज्ञा शब्दार्थसत्तेनें (म्हणजे 'हें जड, जीव, आणि ईश्वरादि भेदांनीं युक्त असलेलें संपूर्ण विश्व ज्या सर्व-कारण परब्रह्मापासून उत्पन्न होतें, व त्यांतच लय पावतें त्या निर्गुण ब्रह्माला 'गज' अशी संज्ञा शास्त्र-प्रसिध्द आहे. विश्वाच्या लयाचें व उत्पत्तीचें कारण प्रणव असल्यामुळें, प्रणवालाही 'गज' असें म्हणतात. त्या गज-प्रणव चिह्नानें ज्याच्या स्वरूपाचें ज्ञान होतें, व जें स्वरूप वरील अर्थसत्तेनें म्हणजे अर्थानुसंधानपूर्वक ध्यानादि साधनानें साक्षात् परब्रह्म प्राप्तीला कारण आहे, तोच परमात्मा स्वानंदेश 'गजानन' होय, अशा अर्थानुसंधानानें) प्राप्त झाली आहे. सर्व विश्वामध्यें सर्वनियामकत्वानें व्याप्त असलेलें त्याचें पंचधा वीर्य म्हणजे–सर्जन, पालन, हरण, चालन आणि मोहनादि सर्वसत्तारूप-सामर्थ्य-कमल अंकुश, परशु, मुद्गर व पाश अशा अन्वर्थक-रूप गुण क्रियादिकांनीं युक्त असलेल्या त्या त्या वीर्याचें बोधन करणाऱ्या पांच आयुधरूपानें स्वानंदामध्यें स्थित आहे; ब्रह्मभूयमहासिद्धि-प्राप्तीला–ब्रह्मसायुज्यतासिद्धीला प्रतिबंध करणाऱ्या मायाबलाचा नाश या पांच आयुधांनीं मिळूनच होत असतो. अंत-र्बहि:स्थित अज्ञानाचा नाश करून, यथार्थ ज्ञानाचा प्रकाश करणें हेंच त्यांचें कार्य असतें. अशा तऱ्हेचें कार्य करणारे पंचगुरु वरील पंचायुधरूपानें स्थित

आहेत, अथवा हीं पांच आयुधें—हें पंचधा वीर्य पंचाचार्यरूपानें वेळोवेळीं प्रगट होऊन आपलें कार्य करीत असतें. यांपैकीं ब्रह्मदेव कमलरूपानें, विष्णु अंकुशरूपानें, शंकर परशुरूपानें, सूर्य मुद्गररूपानें आणि श्रीगणेश पाशरूपानें स्थित असून, त्यांच्या वीर्यवैशिष्ट्यावरून हेंच सिद्ध आहे. यांच्याच अंशानें अवतीर्ण झालेले भृगु, व्यास, शुक, मुद्गल व गणक हे पंचाचार्य 'लोकाचार्य' म्हणून प्रसिद्ध आहेत. कालमानानुरूप जेव्हां अद्वैतसिद्धांत अगदीं शिथिल होतो, व सर्व विद्याही यथार्थस्वरूपांत प्रकट नसतात, अशा वेळीं सर्वतोपरि अज्ञानग्रस्त अशा जनतेचा उद्धार करण्याकरितां वरील लोकाचार्य प्रगट होत असतात, व आपआपल्या नियतीप्रमाणें ग्रंथांचें व सिद्धांतांचें प्रकटन व स्थापन करितात.

या नियमाप्रमाणें कृतयुगांत श्रीगणेश गणकरूपानें प्रगट झाले. त्यावेळीं धर्मस्थिति पूर्ण चतुष्पाद-युक्त असल्यामुळें त्यांनीं पूर्ण अद्वैत सिद्धांताचें स्थापन केलें. हे पांचही गुरूंत आद्य व श्रेष्ठ आहेत. तसेंच आपल्या सिद्धांताचें पूर्ण-ज्ञान व्हावें म्हणून सर्व (अकराशऐंशीं) उपनिषदांचें उपबृंहण करणारा साडे-तीनलक्ष ग्रंथसंख्येनें युक्तअसा ब्रह्मज्ञानसुखोदय संज्ञक परमेतिहास त्यांनीं लिहिला आणि सूत्ररूप महावाक्य प्रस्थानही स्वतंत्र करून स्थापन केलें. अद्वैत सिद्धांताचें शोधन करणाऱ्या चार प्रस्थानापैकीं हें पहिलें व मूलभूत प्रस्थान होय. या महावाक्य प्रस्थानाचें विशदीकरण करण्याकरितांच मौद्गल भार्गव आणि वैय्यासिक्य दर्शनांची प्रवृत्ति झाली आहे. यांचेच (श्रीगणकांचे) अवतार 'श्रीगौडपाद' हे होत. यांनीं श्रीमहावाक्य--प्रस्थानावर लिहिलेल्या भाष्यकारिकादि ग्रंथांपैकीं मांडूक्योपनिषदावरील कारिका मात्र प्रसिद्ध आहेत. श्रीमदाचार्य–भगवत्पादयोगीन्द्रांनीं त्यांच्या कारीकाही श्रुति-तुल्यच मानून त्यांवर भाष्य लिहिलें आहे. कारण श्रीगौडपाद गणकांचे अव-तार असून श्रीगणक हे साक्षाद्वेदपुरुषच होत. याप्रमाणेंच श्रीमुद्गल हे त्रेता-युगांत अवतीर्ण होऊन त्यांनीं शांतिप्रस्थान स्थापन केलें. भृगूंनीं द्वापर कालांत ज्ञान प्रस्थान स्थापन केलें. आणि श्रीव्यासां-नीं द्वापराचे शेवटीं व कलियुगाचे आरंभीं वेदांत प्रस्थानाचें स्थापन केलें. तात्पर्य ज्या ज्या वेळीं सनातन वैदिक धर्म संप्रदायाला शैथिल्य येतें, त्या-

त्या वेळीं तें निरनिराळ्या उपायांनीं नाहींसें करून धर्ममर्यादा पुन्हां पूर्ववत् करण्याचें कार्य वरील पंचाचार्य करीत असतात.

वर सांगितल्याप्रमाणें श्रीगणकांश भगवान गौडपाद यांना–संपूर्ण भारतवर्षांत नामशेष झालेल्या वर्णाश्रम धर्माचें उत्तमप्रकारें स्थापन झालेलें पाहून अत्यंत समाधान वाटलें. पुढें अशाप्रकारें पूर्वमीमांसा संपूर्ण संपादन झाल्यानंतर उत्तरमीमांसेसंबंधीं विचार त्यांचे मनांत वारंवार येऊं लागले. उघडच आहे कीं, भूमी व्यवस्थित व शुद्ध झाल्यावांचून बीजनिक्षेप निरर्थकच ठरणार! आजकाल मात्र कर्मकांडाची जरूरी नाहीं, उपासनेचें नांव नाहीं आणि निष्क्रिय वेदांताचे मात्र पाट वाहूं लागले आहेत! कर्मकांडाचें यथोक्त संपादन करून उपासना कांडाचें अनुष्ठान पूर्ण झाल्यानंतर ज्ञाननिष्ठ होऊन पूर्ण सिद्धीला प्राप्त व्हावें, हें तत्त्वच श्रीगौडपादांनी आपल्या चरित्राच्या द्वारें उपदेशिलें आहे. अस्तु. श्रीगौडपादांनीं भार्येला पुत्राचे स्वाधीन करून गृहाचा त्याग केला, आणि सद्गुरुशोधनार्थ तीर्थयात्रामिषानें सर्वत्र संचार करण्यास आरंभ केला. ते क्रमानें श्रीक्षेत्र भूस्वानंद मोरेश्वर येथें आले. तेथें त्यांना श्री शुकांचें दर्शन झालें.

श्रीमोरेश्वर क्षेत्रांत श्रीमयूरेशाच्या वामभागीं शुक आणि दक्षिणभागीं श्रीमुद्गल सर्वदा दिव्यरूपानें आहेत. व त्यांचें दर्शन अधिकारी लोकांना होतें त्याप्रमाणेंच श्रीगौडपादनांही झालें. तेव्हां श्रीशुकांना नमस्कार करून त्यांनीं प्राकृतभावाला अनुसरून प्रार्थना केली कीं, 'आजवर प्रवृत्तीमार्गाला अनुसरून सर्व कार्य झालें, आतां निवृत्तिसुखप्राप्तीकरितां आपणांस शरण आलों आहे तरी पूर्णज्ञानाचा उपदेश करून मजला कृतार्थ करावें.' 'यथार्थ ज्ञानसिद्धीकरितां जिज्ञासु साधकानें श्रौत–स्मार्त क्रियानिष्ठ व पूर्ण ब्रह्मज्ञानी अशा--अर्थात् 'गुरु' पदवीला अर्ह असलेल्या--महापुरुषाला शरण जावें' अशा भावार्थाचा 'निदेश' श्रुति माउलींनीं केला आहे. त्याला अनुसरून मनुमहाराजांनींही 'नापृष्टः कस्यचिद्ब्रूयान्नचान्यायेन पृच्छतः॥ जानन्नपिहि मेधावी जडवल्लोक आचरेत्' असा निर्बंध उपदेशकांकरितां सांगितला आहे. 'कोणालाही विचारिल्यावांचून सांगू नये, आणि विचारिल्यानंतर अन्यायानें विचारणाराम मुळींच सांगूं नये; तर अशा वेळीं माहिती असतांही ज्ञानी पुरुषानें अज्ञान्याप्रमाणेंच लोकांमध्यें वागावें' असें वरील श्लोकांचें सरळ तात्पर्य आहे. या श्रुति-

स्मृत्युक्त अनुशासनाचें उल्लंघन करून प्रश्नादि व्यवहार केला गेल्यास तो केव्हांही ज्ञानसिध्दीला साधक न होतां, उलट बाधकच होण्याचा संभव असतो यांत संशय नाहीं. म्हणून दुसऱ्या एका ठिकाणीं विद्यादेवीनें ब्राह्मणाला सांगितलें आहे कीं, 'असूयक अनृजु आणि शठ अशा पुरुषाला माझें दान कदापि करूं नकोस, तरच मी वीर्यवती राहीन' श्रध्दा, भक्ति आणि प्रणति या तीनही प्रकारांनीं युक्त असा जो प्रश्न असतो तोच न्यायानें केलेला प्रश्न असतो, व या तीन धर्मांपैकीं एखादाही धर्म सुटून प्रश्न झाल्यास तो न्यायानें केला असें होत नाहीं. कारण अशा ठिकाणीं वरील दोष उत्पन्न होण्याचा संभव असतो. श्रद्धा म्हणजे दृढ विश्वास तो नसेल तर असूया दोष उत्पन्न होतो. तसेंच भक्ति म्हणजे आदर आणि प्रणति म्हणजे तो आदर व्यक्त होण्याची क्रिया. हीं नसतील तर अनृजुत्व ( सरळपणा नसणें ) व शठत्व ( दांभिकपणा ) हे दोष उत्पन्न होतात. तात्पर्य श्रद्धादि धर्मांनीं युक्त होऊन प्रश्नादि व्यवहार करणारानांच खरें ज्ञान होत असतें,हा अनुभव सामान्य व्यवहारांतही जर नेहमीं येत असतो, तर अत्यंत श्रेष्ठ व पवित्र ज्ञानाविषयीं काय सांगावें, पण हल्लीं मात्र वरील गोष्टींकडे पूर्ण दुर्लक्ष झाल्यामुळें व होत असल्यामुळें प्रश्नोत्तरादि व्यवहार केवळ दुकानदारीप्रमाणेंच झाले व होत आहेत! मग यथार्थ फलप्राप्ति-ज्ञानसिद्धि होत नसल्यास त्यांत नवल कसलें? जिज्ञासु साधकांनीं तिकडे दुर्लक्ष मुळींच करूं नये. अस्तु. श्री गौडपादांनीं वरील नियमास अनुसरूनच श्रद्धेनें व भक्तीनें श्रीशुकाचार्यांना साष्टांग नमस्कार करून वरीलप्रमाणें प्रार्थना केली.

अशी प्रार्थना ऐकून श्रीशुकांनींही त्यांना तथेचें संन्यासदीक्षा देऊन,श्रीमुद्गलाज्ञेनें गाणपतादि सर्व संप्रदायांचे व महावाक्य प्रस्थानाचें दान केलें, व त्यांचें आश्रमनाम 'गौडपाद योगीन्द्र' असें ठेविलें·अद्वैताचार्य हे सर्वच योगोपासक असल्यामुळें त्यांची सर्व परंपरा 'योगीन्द्र ' या उपपदानेंच शास्त्रांत प्रसिद्ध आहे. आमच्या मुख्य चरित्रनायकापर्यंत श्रीशृंगेरी पीठस्थयतींना हें 'उपपद' असल्याचें दिसतें. पुढें मात्र दिसत नाहीं. असो याप्रमाणें श्रीगौडपादाचार्यांस योगोपासनेच्या सर्व दीक्षा मिळाल्यानंतर त्यांनीं त्यांचें अनुष्ठान पूर्ण संपादन केलें. त्यांतील द्वितीय दीक्षेंत 'श्रीरत्नगर्भ' प्रणव मूर्ति व त्रितीय दीक्षेंत श्रीचंद्रमौ-

लीश्वर लिंग–श्रीशुकाचार्य साक्षाच्छिव म्हणून--गुरुपूजार्थ मिळालें, आणि ज्ञानदीक्षासमर्थी ब्रह्मसूत्रप्रबंध महावाक्य दर्शनादि ग्रंथ मिळाले. नंतर त्यांच्या यथोक्त अनुष्ठानानें श्रीगौडपादांना पूर्ण शांती मिळाली. पुढे शिष्यांसह सर्वत्र ज्ञानमार्गाची स्थापना करून श्रीगौडपादाचार्य बदरिकारण्यांत आले. तेथें त्यांना श्रीवेदव्यासाचें दर्शन झालें. त्यावेळी व्यासांनीं त्यांना आज्ञा केली कीं, तूं विंध्याद्रीच्या उत्तरभागीं निवास करून आतांपर्यंत संस्थापित झालेला अद्वैत संप्रदाय रक्षण करावास आणि श्रीशंकरावतार होईपर्यंत येथें पृथ्वीवर राहून त्याला हे सर्व संप्रदाय द्यावेस. तसेंच कलिकालानुरूप सर्वत्र वर्णधर्म प्रधान अद्वैतसंप्रदाय प्रवृत्त करून सांगोपांग धर्माचें संपादन होण्याकरितां ब्रह्मभूय महासिद्धि पीठाचा उद्धार करण्याविषयीं त्याला (श्रीशंकराचार्यांना) आज्ञा करावीस. 'याप्रमाणें सांगून श्रीव्यास व्यासबिलांत प्रविष्ट झाले. व श्रीगौडपादही बदरिकारण्यांत स्थित झाले. त्यांनीं आपल्या-विद्या व योग यांच्या प्रभावानें अरण्यवासी जनांत आणि पुरादिकांतही शांतिप्रस्थानत्रय व ज्ञानामृत शास्त्र या ग्रंथांसह अद्वैत सिद्धांताचें स्थापन केलें. त्यांच्या अवतारकालीं मगध देशांत शुंग नांवाचा राजा राज्य करीत असून, त्यांची स्थिति पृथ्वीवर एकंदर एक हजार वर्षे होती. त्यांनीं शांतिप्रस्थानत्रयांतील मांडूक्योपनिषदावर अत्यंत सुबोध अशा कारिका लिहिल्या असून त्या पुढें श्रीमदाद्य शंकराचार्यांस-ज्ञानदीक्षासमर्थी दिल्या.

नंतर श्रीव्यासांच्या आज्ञेला अनुसरून शंकरागमनापर्यंत श्रीगौडपादयोगीन्द्रांनी तेथेंच निवास करून श्रीशंकरांश श्रीशंकराचार्यांना–गोविन्दपाद योगीन्द्रद्वारा–उपदेश दीक्षा देववून त्या त्या दीक्षा कालीं आपण ज्यांची पूजा करीत होते त्या रत्नगर्भ व चंद्रमौलीशलिंग या दोन्ही मूर्ती दिल्या व त्यांचें नांव 'भगवत्पाद योगीन्द्र' असें ठेविलें. तसेंच त्या कालाला अनुसरून शुद्धाद्वैत संप्रदाय सर्वत्र प्रवृत्त करण्याकरितां दशोपनिषदें, वेदांतदर्शन व भगवद्गीता यांवर भाष्यलिहिण्याविषयीं आणि श्रीब्रह्मभूय महासिद्धि—पीठ निर्वहणाविषयीं त्यांना आज्ञा केली. शेवटीं आपलें सर्व अवतारकृत्य संपवून श्रीगुणेशांश भगवान् 'श्रीगौडपाद योगीन्द्राचार्य' यांनी या भूलोकांतून आषाढशुक्ल १५ मेस ब्रह्मलोकीं प्रयाण केलें.

अशा प्रकारें भगवान् श्रीगौडपाद योगीन्द्रांनीं–प्रथम बौद्धादिकांनीं दूषित झालेल्या भारत भूमीस कर्ममार्ग प्रवृत्तीनें शुद्ध करून, तिनें शुद्धचित्त झालेल्या संस्कारी जनतेच्या अंतःकरणांत--पूर्णशांतिसिध्यर्थ शांतिप्रस्थानत्रयोपदेशरूप बीजनिक्षेप केला. पुढें वर्णधर्मरक्षणरूप जलसेचनानें वृक्षरूपांत परिणत झालेल्या त्या बीजाचीं फळें अधिकारी जनतेस चाखावयास मिळावींत म्हणून श्रीशंकराचार्यांकरवी मतधर्मादि सांगोपांग सद्धर्मरक्षक श्रीब्रह्मभूय महासिद्धि पीठाचा उद्धार करविला असें हें सूत्र आहे.

या प्रमाणें परब्रह्मगुरु श्रीगौडपादयोगीन्द्राचें चरित्र संक्षेपतः येथें पूर्ण झालें आहे.

---

## ॥ श्रीगौडपाद मंगलम् ॥

श्लोक—अनुष्टुप्

वल्लभेशं नमस्कृत्य गुणेशांशसमुद्भवम् ॥
श्रीगौडपाद योगींद्रं नमामि मंगलाप्तये ॥१॥

इंद्रवज्रा

साक्षात्तुरीयं परमव्ययं यत् विष्ण्वंशिकेनानधिकार–दायी ॥
तस्यांशभूतं पुरुषं महांतं--तं गौडपादेन्द्रमहं नमामि ॥२॥
पाखण्डषट्कं जिनबुद्धमुख्यं वृद्धं यदा भारतभूमिभागे ॥
तं खण्डितुं मानुषदेहभृद्य–स्तं गौडपादेन्द्रमहं नमामि॥३॥
तिष्ये द्विसाहस्रगतेऽथ काले–चैत्रे सिते रोहिणिभे धनुःस्थे।
लग्ने गुरौ युग्मतिथावभूद्यस्तं गौडपादेन्द्रमहं नमामि ॥४॥
शुंगे नृपे शासति मागधे यो गङ्गातटे माधव–विप्रगेहे
बालःप्रतिष्ठानगरे बभूव--तं गौडपादेन्द्रमहं नमामि ॥५॥
श्रीविक्रमार्कस्य नरेश्वरस्य साहाय्यमादाय च बौद्धषट्कम् ।
संखण्डयामास महादयालु स्तं गौडपादेन्द्रमहं नमामि ॥६॥
वर्णाश्रमाणां परिपालनाय चक्रे बहून्यःस्वयमेव यज्ञान् ।
संस्थापितो येनच धर्मसेतु स्तं गौडपादेन्द्रमहं नमामि ॥७॥
यातस्ततः सत्समयं सुदिव्यं संस्थापितुं श्रीबदरीवने च ।

संन्यस्य लेभे शुकतः सुदीक्षां तं गौड पादेन्द्रमहं नमामि ॥८॥
श्रीरत्नगर्भं शशिमौलिनं च स्वेष्टं गुरुं भक्तिमनाः पुपूज ।
यस्तौ ददावादिम शङ्कराय तं गौडपादेन्द्रमहं नमामि ॥९॥
माण्डूक्यशीर्षेऽपि च गीतसारं ज्ञानामृतं दर्शनकं स्वकीयं ।
सिद्धान्तमित्येव चकार लोके तं गौडपादेन्द्रमहं नमामि ॥१०॥
कृत्वाथ माण्डुक्यसुकारिकां यो गोविन्दयोगिन्द्रमथो ददौ तां ।
लेभे च यां शङ्करदेशिकोऽते तं गौडपादेन्द्रमहं नमामि ॥११॥
श्रीशङ्कराचार्यसु--दर्शनार्थं साहस्रवर्षाण्यवसद्धरण्यां ।
भाष्ये तमाज्ञाप्य ययौ स्वलोकं तं गौडपादेन्द्रमहं नमामि ॥१२॥
एवं चरित्राणि बहूनि कृत्वा ह्याषाढमासे सितपूर्णिमायाम् ।
यःस्वेच्छाया ब्रह्मपदं जगाम तं गौडपादेन्द्रमहं नमामि ॥१३॥
यो वै परंब्रह्मगुरूर्गुरूणा मद्वैतगानां परमाधिराजः ।
ज्ञानेप्सुभिः सेव्यतमश्चनित्यं तं गौडपादेन्द्रमहं नमामि ॥१४॥

अनुष्टुप

इदं श्रीगौडपादानां महामंगलदं परम् ।
यः स्तोत्रं पठते भक्त्या स परां शान्तिमाप्नुयात् ॥१५॥
वल्लभेशद्वितीयायां मंगलोत्सवसंज्ञके ।
मंगलेऽवातरद्योगी तनोतु परमङ्गलम् ॥१६॥
तन्मंगलनिमित्तेन मङ्गलप्राप्तयेऽपि च ।
मङ्गलाख्यस्तवेनासौ संस्तुतोऽङ्कुशधारिणा ॥१७॥
इति श्रीगौडपादमंगलम् संपूर्ण ॥
श्रीयोगीन्द्रपादार्पणमस्तु

---

## श्रीब्रह्मभूय महासिद्धि पीठनाथाः श्रीमद्गिरिजासुत योगीन्द्राचार्या विजयन्ते !

ध्यान श्लोक संस्कृत ( स्रग्धरा )

श्रीमद्योगीन्द्रमाद्यं गुरुवरममलं गाणपानां कलौ तं ।
तुर्यातीते सुसंस्थं युगभुजमतुलं दिव्यदेहं यतीन्द्रम् ॥

सिन्दूरारक्तकान्तिं तिलकविलसितं पद्मनेत्रं प्रसन्नम् ।
ध्याये पद्मासनस्थं वरदमतिकृपं पीठनाथं सुशान्तम् ॥४॥

श्रीगिरिजासुत योगीन्द्रांची आरती ( प्राकृत )

जय जय श्रीगिरिजासुत गाणपताचार्या ॥
जगद्गुरो हे आरति करितों पदवर्या ॥ धृ० ॥
कलियुगिं गाणप झालें लुप्त जया काळीं ।
अवतरसी यतिवर्या साक्षाद्वनमाळी ॥
यतिवेषें हरि होसी बौद्धादिक मेळीं ।
शंभुनिदेशें पीठप होशी शुभ काळीं ॥१॥
षड्विध गाणापत जगिं संस्थापन करिसी ।
भारतिं दिग्विजयाचें शस्त्र करीं धरिसीं ॥
विजयादिक बहुग्रंथीं मोहतमा हरिसीं ।
येइल कोण दुजा जगिं या गुरुता सरिसी ॥२॥
सर्वांगीं सिंदूरोध्दूंळन तिलकयुत ।
गाणेशाक्ष-सुकाषायित वस्त्रासहित ।
तुर्यातीत परात्पर चिंतिति जे विहित ।
अंकुशधारि म्हणे ज्या लाधे पूर्ण हित ॥३॥
जय जय श्रीगिरिजासुत० ॥जगद्गुरो ॥

वंदन—श्लोक प्राकृत ( शा. वि. )

श्रीगाणेश जगद्गुरू कलियुगीं विष्णंवश जे आद्य कीं ।
झाले गाणप योगिवर्य भगवत्पादेन्द्र सच्छिष्य कीं ।
श्रीमायूरपुरीं निवास करुनी गाणेश संस्थापिती ।
वन्दूं ब्रह्म सु भूय सिध्दिद महा पीठेश भावें यती ॥१॥

श्रीमदाद्य श्रीगिरिजासुत योगीन्द्राचार्य महाराज की जय.

वैशाख शुक्ल १५ श्रीयोगीन्द्र शके ३४४.

इति श्रीपरंब्रह्म गुरु श्रीगौडपाद
योगीन्द्र-चरित्र संपूर्णम्.

## २ श्रीमत्परमगुरु श्रीमच्छंकरांश श्रीमदाद्यशंकराचार्य-

# श्रीभगवत्पाद योगीन्द्र चरित्र.

श्लोक—( स्रग्धरा )

"श्रीमत्कैलासनाथं धृतनरवपुषं शंकरं शंकरन्तम् ।
ज्ञानेशं ज्ञानदाने कलियुगसमये सद्गुरुत्वे प्रयुक्तम् ॥
श्रीमद्भिर्गौडपादैर्जगति हरिहराम्बागणेशेनमार्गान् ।
अद्वैतान् स्थापयन्तं गुरुवर-भगवत्पाद-योगीन्द्रमीडे ॥१॥"

## पूर्व पीठिका.

१

सनातन वैदिक धर्मसंप्रदाय—प्रवर्तक व अधिकारानुरूप अद्वैतमार्गप्रवर्तक सद्गुरूपंचकांपैकीं परंब्रह्मगुरु श्रीगौडपाद योगीन्द्रांचें चरित निरूपण केल्यानंतर परमगुरु श्रीमच्छंकरांश श्रीभगवत्पाद योगीन्द्रांचें चरित्र संग्रहानें पुढें दिलेलें आहे. श्रीमदाद्य शंकराचार्य यांचें चरित्र प्रायः सर्वश्रुत आहेच. त्याचा संक्षेपतः निर्देश करून, सर्वत्र अप्रसिद्ध पण महत्वाच्या अशा त्यांच्या चरित्रभागाचा उल्लेख विशेषतः येथें विशद केलेला आहे.

कलियुगाचीं सुमारें दोन हजार वर्षें इतका काल गेल्यानंतर श्रीगौडपाद योगीन्द्रांचा अवतार होऊन, त्यांनीं त्यावेळीं वाढलेल्या दुर्मतांचें खंडण करून कर्मोपासनाज्ञानात्मक वैदिकमार्ग यथापूर्व प्रवृत्त केला; आणि श्रीशुकाज्ञेप्रमाणें श्रीशंकराचार्यांना केवल सर्व संप्रदाय देण्याकरितां त्यांनीं सुमारें एक हजार वर्षें बदरिकारण्यांत निवास केला. अर्थात त्यांचा शेवटला बराचसा काल बाह्यव्यवहारशून्य—आत्मध्याननिष्ठ-स्थितींतच गेला. इकडे त्यांनीं अद्वैतसंप्रदाय रक्षण करण्याकरितां नियुक्त केलेल्या शिष्यपरंपरेच्या द्वारें अद्वैतमार्ग कमी अधिक प्रमाणें रक्षण झाला. परंतु पुढें कलिकालकौटिल्यामुळें ती व्यवस्था शिथिल होत जाऊन योग्य साहाय्याच्या अभावीं तो मार्ग लुप्तप्राय झाला. ही संधी साधून पूर्वी श्रीगौडपादांनीं त्या त्या वेळच्या राजांकडून भारतवर्षाबाहेर हांकून दिलेले बौद्धादि मार्गी लोक पुन्हां भारतवर्षांत आले; व आपले अनुयायी वाढविण्याचा त्यांनीं सपाटा सुरू केला. केव्हांहि धर्मविरुद्ध अधर्माला ज्यावेळीं चढाई करावयाची असते, तेव्हां तो धार्मिकांकडूनच धर्महानि होण्याची वाट पाहत असतो! कारण उघड उघड धर्माशीं सामना देणें त्याला शक्य नसतें. पुढें कोणच्याही कारणानें कां होईना धार्मिकांकडूनच ज्यावेळीं

धर्महानि होऊं लागते, त्यावेळीं हा अधर्म-अर्थात अधर्मप्रिय लोकांना हाताशीं धरून त्यांच्या बुद्धींत प्रेरणा करवून–हेतुवादानें धर्मनिष्ठांत फूट पाडण्याचा प्रयत्न कारितो व कालाचें अनुकूल्य असल्यामुळें त्यांत त्याला यशही मिळतें; आणि अशा रीतीनें धर्महास होऊन अधर्मवृद्धी होते. या क्रमाप्रमाणेंच श्रीगौडपादांच्या दिग्विजयानंतर भारतवर्षांत बौद्ध, तांत्र, पाषण्ड, इत्यादि लोकांचें प्राबल्य वाढूं लागले. पूर्वी केवळ-कोशाभिमानी (अन्न, प्राण, मन, विज्ञान इत्यादि कोशांनाच आत्मा मानणारे चार्वाकादि सह) बुद्धादिकांच्या योगानें ज्ञानाभास–मिथ्याज्ञान मार्गच वाढून विशेषत: कर्मकांडाचा उच्छेद केला गेला होता. पण यावेळीं वैदिक कर्मकांड–स्वधर्माचरण तर नष्टप्राय झालेंच, शिवाय वैदिक उपासनामार्ग नष्ट होऊन, तांत्र पाषंड आणि आभासमार्ग वाढून केवळ काम्य व निषिद्ध कर्माचरणाकडेच सर्वांची प्रवृत्ती झाली. मग परम पवित्र अशा ज्ञानमार्गाची जाणीव कोठेंच नसल्यास नवल काय? अर्थात् परमसुखरूप ब्रह्मसायुज्यान्त सिद्धि देणाऱ्या अशा कर्मोपासना–ज्ञानात्मक मार्गाचा सर्वत्र लोप झाला!

मल विक्षेप आणि आवरण हे तीनही दोष जनतेंत अतीशय वाढले, त्यामुळें व्यक्तिमात्रांत स्वार्थी व लोभी वृत्ती झपाट्यानें वाढूं लागली, नाना प्रकारच्या दैवी आपत्ती येऊं लागल्या आणि परस्परांत परस्पराविषयीं मत्सर व द्वेषबुद्धि आधिकाधिक वाढूं लागली. तात्पर्य कोणीच कोणाचा योग्य शास्ता नसल्यामुळें, मन मानेल त्याप्रमाणें यथेच्छाचार सुरू झाला. जो तो–कोणी हेतूवादानें तर कोणी नानाप्रकारचें चमत्कार दाखवून, कोणी बलात्कारानें तर कोणी आमिष दाखवून जनतेला आपआपल्या संप्रदायांत खेंचून, त्याची वाढ करू लागला. अशा वेळीं स्वधर्माचरणाच्या अभावामुळें–स्वधर्माचरण हेंच ज्यांचें अन्न आहे असे पर्जन्यादिद्वारानें जगद्रक्षण करणारे इंद्रादिदेव-आहाररहित झाले व जगद्रक्षणाची त्यांची शक्ति अर्थातच नाहींशी झाली. 'हा अकालीं प्रळयच होईल कीं काय' अशी भीति पडल्यामुळें ते इंद्रादिक देव सर्वेश्वर भगवान् श्रीशंकरांना शरण गेले, आणि साष्टांग नमस्कार करून त्यांनीं प्रार्थना केली. ' भगवन् हल्लीं कलियुगाचा आरंभ असून यावेळींच सर्वत्र पूर्ण धर्मनाश झाला आहे? वर्णाश्रमधर्म, वैदिक उपासनामार्ग यांचें कोठेंहि नांव नाहीं, सर्ववेदसिद्धान्तभूत ब्रह्मविद्या तर मृतप्रायशीच झालेली आहे, केवळ शिश्नोदरपरायणत्व हाच एक परम पुरुषार्थ होऊन बसला आहे

सर्व वर्ण एकरूप--एकाच मार्गानें चालणारे झाले असून, केवळ विचारांत मात्र स्पृश्यास्पृश्यादि तिरस्कारदर्शक उच्चनीचताभाव उरलेला आहे. तात्पर्य कलियुगाचें शेवटीं होणारी परिस्थितीच आज प्राप्त होत आहे कीं काय, अशी आम्हांस भीति वाटून आम्ही शरण आलों आहोंत. तरी कृपाकरून पूर्ववत् धर्मस्थापना करून आमचें रक्षण करावें,' अशी प्रार्थना ऐकून श्रीशंकरांनीं त्यांना अभय दिलें! आणि पूर्व नियतीप्रमाणें कलियुगांतील आपल्या अवतार कालाची संधि जाणून, आपला मुख्यमंत्री जो 'अघोररुद्र' त्याला भारतवर्षांत अवतीर्ण होऊन ज्ञानमार्ग स्थापन करण्याविषयीं आज्ञा केली. तसेंच तत्पूर्वी ज्ञानमार्गाला अवश्य साधक अशा वर्णाश्रम धर्माची प्रवृत्ति करण्याकरितां ब्रह्मदेव, स्कंद, इंद्र, व इतर देवगण यांना आज्ञा केली !

श्रीशंकरांच्या आज्ञेप्रमाणें इंद्र राजकुलांत अवतीर्ण होऊन, 'सुधन्वा' नांवाचा राजा झाला. कर्मकांडाची प्रवृत्ति करण्याकरितां स्कंद 'कुमारिल भट्ट' नांवानें ब्राह्मण कुलांत उत्पन्न झाले! त्यांच्या सहाय्याकरितां ब्रह्मदेव मंडनमिश्र नांवानें व इतर देवही नानारूपांनीं द्विजकुलांत उत्पन्न झाले. अनुयायांशिवाय संप्रदाय प्रवृत्ति होत नसते व प्रथम सद्धर्मसंप्रदायी अनुयायी होण्याकरितां अशीच व्यवस्था वेळोवेळीं होत असतें. असा नियम आहे. कुमारिल भट्टांनीं प्रथम वेदविद्येचे सांग संपादन करून, त्यावेळीं वाढलेल्या बौद्धमार्गाचें तत्व जाणण्याकरितां किंचित्काल बौद्धमार्गाचा अवलंब केला. केवल सद्धेतूनें--धर्मकार्याकरितांच जें हें निषिद्धाचरणरूप कर्म घडलें, त्या दोषाच्या नाशाकरितां पुढें श्रीकुमारिलभट्टांनीं 'तुषाग्निभक्षण' रूप मोठें दुर्घट प्रायश्चित केलें! यावरून निषिद्धाचरणाचें अनिवार्य दोषबाहुल्य व "अश्रौतधर्माचरणात् क्षिप्रं नश्यति वै कुलम्" या शास्त्रीय निर्बंधाचें पालन करण्याविषयींचा त्यांचा कटाक्ष हीं स्पष्ट व्यक्त होतात. अस्तु !

कुमारिलभट्टांनीं नंतर प्रथम सुधन्वा राजाला स्वाधीन करून घेऊन युक्ति, श्रुति व प्रत्यय यांच्या योगानें सर्व बौद्धमार्गीयांचें खंडण केलें. आणि सुधन्वा राजाकडून त्यांचा नाश करविला. अशा रीतीनें बौद्धमार्गाचें उच्चाटन केल्यावर कुमारिलभट्टांनीं सर्वत्र कर्ममार्ग यथाक्रम प्रवृत्त केला. त्याचवेळीं मंडनमिश्रांनींही यज्ञयागादि कर्ममार्ग वाढविण्याचा क्रम जोरानें सुरू केला. बौद्धमार्गाच्या प्रभावामुळें केवळ मिथ्याज्ञान--वाचामात्र ज्ञान व त्याचें द्योतक असा वेषमात्र संन्यासमार्गच सर्वत्र फार वाढला होता. त्याचें पूर्ण खंडन होण्याकरितां कर्म-

कांडालाच प्राधान्य देऊन कर्मच सर्वश्रेष्ठ व परमगतिभूत आहे, असा सिद्धान्त मण्डनमिश्रांनीं सर्वत्र प्रस्थापित केला. 'संन्यासी दिसला कीं तावडतोब त्याला गृहस्थाश्रमी करवून कर्मपरायण करावयाचें' असा नियमच ठरविला गेला होता. अस्तु! याप्रमाणें वर्णाश्रमधर्माला ध्वजभूत असलेल्या कर्ममार्गाचा पूर्ण फैलाव झाल्यामुळें सर्व जनता स्वधर्मनिष्ठ (धर्मैकदेशकर्ममार्गनिष्ठ) होऊन कर्ममार्गनिष्ठता हेंच परमकर्तव्य अशी समजूत सर्वत्र रूढ झाली.

तिचा परिणाम साहजिकपणेंच अत्यंत श्रेष्ठ परम सिद्धान्तरूप व परम पुरुषार्थभूत अशा ज्ञानकांडाविषयींच्या उदासीनतेंत झाला! इतकेंच नव्हे तर या परिस्थितीचा फायदा घेऊन द्वैतमार्गपोषक तांत्र पाषण्डादि निंद्याचारांची प्रवृत्ति झपाट्यानें केली गेली. याकरितांच भगवान् श्रीमच्छंकरांना द्वैतनिरसनपूर्वक अद्वैतसिद्धान्त संस्थापनार्थ अवतार धारण करावा लागला. तथापि कुमारिलभट्ट व मंडनामिश्रादिकांनीं निर्माण केलेली स्वधर्माचार—प्रवृत्तीच श्रीमदाचार्यांच्या अवतार कार्याला पूर्णपणें साधक झाली. किंबहुना अशा तऱ्हेच्या कर्मकांडप्रवृत्तिविंचून उपासना व ज्ञानकांडाची स्थिति होणें शक्य नव्हतें. तात्पर्य अशा तऱ्हेनें कलियुगाचार्य श्रीशंकरांश श्रीमदाद्य श्रीशंकराचार्य यांच्या अवतारकालाला अगदीं अनुकूल अशी परिस्थिति या भारतवर्षांत निर्माण झाली होती! यांत संशय नाहीं. तो काल म्हणजे कलियुगाचा तीन हजार वर्षे संपण्याचा सुमार होय.

श्रीमदाद्य शंकराचार्य यांच्या अवतारकलाविषयीं हल्लीं मोठमोठ्या विद्वानांत बराच मतभेद असून, तो एक मोठा वादग्रस्त विषयच होऊन बसला आहे? वस्तुतः शृंगेरी, कामकोटी (कांची), इत्यादि श्रीमदाचार्यपीठांतील जुन्या उल्लेखांवरून व त्यालाच जुळत्या असलेल्या आर्षवचनांवरून वरील कलियुगाची तीन हजार वर्षे संपण्याच सुमार—हाच काल निश्चित ठरतो. पण कित्येक विद्वानांना तो संमत नसून आद्याचार्यांचा अवतार सहाव्या किंवा सातव्या शतकांत झाला असावा असा त्यांचा तर्क आहे. पण तो शेवटपर्यंत टिकत नाहीं. याविषयीं आजवर पुष्कळ उहापोह झाला आहे, पण त्यांतून निश्चित असें कांहींच निष्पन्न झालें नाहीं, किंवा त्यांमुळें वरील जुन्या व आर्ष उल्लेखालाही बाध येत नाहीं. श्रीमदाचार्यांसारख्या अद्वितीय—लोकोत्तर विभूतिमान् पुरुषांच्या अवतारकाल-ज्ञानाविषयीं अशा तऱ्हेनें अनिश्चितता असणें हें कालकौटिल्य तर खरेंच! पण श्रीमदाद्यशंकराचार्य व त्यानंतर

१४४५

त्यांच्याच पीठावर मागाहून बऱ्याच कालानें म्हणजे सुमारें शालिवाहनाच्या सहाव्या शतकांत होऊन गेलेले दुसरे महान् अधिकारीपुरुष—शंकराचार्य—यांच्या चरित्रांतील कांहीं गोष्टींच्या साम्यावरून,—त्यांच्यानंतर लिहिल्या गेलेल्या शांकरदिग्विजयादि ग्रंथांतून आलेलें दोघांच्याहि चरित्रांचें मिश्रणात्मक वर्णन वरील कालविपर्यासास मुख्यतः कारण झालेलें आहे. ही गोष्ट कामकोटी पीठावर अडीचशें वर्षांपूर्वीं होऊन गेलेल्या श्रीसदाशिवब्रह्मेन्द्रांनीं 'वेदांतपंचप्रकरणी' म्हणून जो एक ग्रन्थ लिहिला आहे, त्यांतील 'जगद्गुरुरत्नमालास्तोत्राच्या १७ व्या श्लोकावरील टीकेंत स्पष्टपणें नमूद आहे. अर्थात श्रीमदाचार्य-आद्य श्रीशंकराचार्य-श्रीभगवत्पाद योगीन्द्र यांचा अवतारकाल दोन हजार वर्षांपूर्वींचाच निश्चित आहे. श्रीगौडपादांचे शिष्य, षण्मतसंस्थापक, भाष्यकार ते हेच होत. आणि पुढें झालेले ते दुसरे शंकराचार्य होत. यांनी आद्याचार्यांप्रमाणेंच सर्वत्र दिग्विजय करून आचार्यस्थापित ग्रंथादिकांचें विशेष प्रवर्तन केलें. यांनाही श्रीशंकरांशच मानीत असत. पुराणांतूनही क्वचित श्रीशंकरांचें अवतरण कलियुगांत द्विवार होत असल्याचें सांगितलें आहे. जैन ग्रंथांतून असे मुख्य शंकराचार्य तीन झाले असल्याचें सांगितलें आहे. पैकीं पहिल्या शंकराचार्यांविषयींचा उल्लेख श्रीगौडपादाचार्यांनीं आपल्या पुढील कांहीं काळांत केलेल्या अद्वैतसिद्धान्तस्थापनावरून—त्यानांच उद्देशून असावासें दिसतें. तथापि त्या ग्रंथांतूनही बऱ्याच हकीकती विपर्यस्त व परस्परविरोधी दिसतात. अस्तु.

आपल्या आज्ञेप्रमाणें संपूर्ण भारतवर्षांत स्कंद ब्रह्मदेव इंद्र इत्यादिकांच्या द्वारें बौद्धांचे खंडण होऊन कर्ममार्ग पूर्ण प्रवृत्त झाल्याचें पाहून, भगवान् श्रीमच्छंकर ज्ञानमार्ग प्रवृत्तीविषयीं विचार करूं लागले.

## अवतरण व पुढील कार्य.

## २

सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीं केरळ देशांत पूर्णानदीच्या कांठीं असलेल्या कालटी नामक गांवामध्यें 'विद्याधिराज' नांवाचे एक द्विजश्रेष्ठ राहत असत. ते सदाचारसंपन्न व सर्वशास्त्रें जाणणारे असून, मोठे शिवभक्त होते. त्यांना 'शिवगुरु' या नांवाचा पुत्र होता. तो अत्यंत बुद्धिमान असून लहानपणापासूनच वैराग्यशील होता. यथाकालीं ब्रह्मचर्याश्रमधर्मपालनपूर्वक संपूर्ण वेदविद्येचें अध्ययन झाल्यानंतर पित्राज्ञेनें शिवगुरूंनीं गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला.

त्यांची स्त्री आर्या अंबा ही रूप, गुण, शील इत्यादिकांनीं त्यांना अनुकूल अशीच होती. उघडच आहे कीं, ज्या ठिकाणीं परमात्मविभूतीचा अंश येणार असून, त्याच्या द्वारानें धर्मस्थापनेचे अलौकिक महत्कार्य होणार होतें, त्या ठिकाणीं भलतीच अगर विगुण स्थिति कशी असणार ? । कोणत्याहीं स्थिती-पासून स्वयंसिद्ध अशा महद्विभूतींचा जरी कांहीं लाभ किंवा तोटा नसला,- अगर न्यूनता नसली, तरी लोकसंग्रहाकरितां लोकांना उन्मार्गापासून निवृत्त करून सन्मार्गाकडे वळविण्याकरितां अशा स्थितीचीच अत्यंत अपेक्षा असते. शिवगुरु आणि अंबा यांची अंतर्बाहि:स्थिति या गोष्टीला अनुकूल अशीच होती. असो. याप्रमाणें सुशील, धर्मनिष्ठ व सानुकूल गृहीणीच्या योगानें शिवगुरूंचा गृहस्थाश्रम जो त्यांना प्रथम बंधनकारक व तिरस्कार्य वाटत होता, तो—त्यांना अत्यंत सुखावह असाच झाला. तथापि अशा स्थितींतही त्यांना दुःख देणारी अशी एक गोष्ट होती. ती ह्मणजे संततीचा अभाव ही होय. तशा स्थितींत कांहीं काल गेल्यानंतर शिवगुरूंनीं पुत्रप्राप्ती-करितां आपल्या भार्येसह श्रीशंकराचे एक अनुष्ठान आरंभिलें. त्यायोगानें संतुष्ट होऊन एके दिवशीं श्रीशंकरांनीं त्यांना स्वप्नांत दर्शन देऊन विचारिलें कीं, ' सर्वगुणसंपन्न सर्वज्ञ, व लोकविख्यात असा एकच पुत्र पाहिजे किंवा मूर्ख व अल्पायुषी असे अनेक पाहिजेत ? ' त्यावर शिवगुरूंनीं सर्वज्ञ असा एकच पुत्र मागितला, कारण पुत्रत्व प्राप्तीचा हेतू अज्ञ अशा पुष्कळ दीर्घायु पुत्रांकडून कसा सफल होणार ? श्रीशंकरहि ' तथास्तु ' म्हणून अंतर्धान पावले. शिवगुरु व अंबा या उभयतांनाही अत्यंत आनंद व धन्यता वाटली पुढें शिवप्रसादानें सती अंबा गर्भवती झाली. गर्भाला अनुरूप असे नानाप्र-कारचें दोहद ( डोहाळे ) होऊं लागले. क्रमानें नऊ महिने पूर्ण झाल्यावर वैशाख शुक्ल पंचमीच्या दिवशीं शुभकालीं—ग्रहस्थिति शुभ असतां, भगवान् ' श्रीशंकर ' माता अंबेच्या पोटीं सगुणरूपानें प्रकट झाले. त्यावेळीं शिव-गुरूंना व इतरहि तेथील द्विजादिकांना अत्यंत आनंद झाला. शिवगुरूंनीं पुत्राचे जातकर्मादि संस्कार यथाविधि केले पुढें अकरावें दिवशीं—श्रीशंकर-प्रसादानें मुलगा झाला असल्यामुळें—'शंकर' असें मुलाचें नामकरण केलें. जन्मकालाची ग्रहस्थिति पाहून पुष्कळ ज्योतिर्विदांनीं पुढील अवतारकृत्याला अनुकूल अशीं भविष्यें वर्तविलीं. हेच 'श्रीमदाद्य शंकराचार्य' होत. शंकरांना दुसरें वर्ष लागतांच अक्षरज्ञान झालें. तिसरें वर्षी काव्य पुराणें इत्यादिकांत

3८९3५ ... ५५ ... १२५ ... २८-९-५५

प्रवेश झाला. त्यांच्या बुद्धीची तीव्रता इतकी होती कीं, एकवार गुरूकडून श्रवण होतांच त्यांना मुखोद्गत होत असे. साक्षात् विद्यानाथ 'श्रीशंकरच ते ! मग तेथें काय अशक्य? केवळ प्राकृत भावाला अनुसरून सर्व व्यवहार चालू होते इतकेंच या सर्व गोष्टींमुळें शिवगुरूंना केवढा आनंद व कौतुक वाटलें असेल ? पण त्यांच्या दैवाला मात्र हें त्यांचें सुख पाहवलें नाहीं ! यांच संधीला त्यांचे देहावसान झाले. मग अर्थातच बाल शंकराच्या रक्षणाचा भार सर्वस्वी मातुश्री अंबेवरच येऊन पडला.

श्रीमदाद्यशंकराचार्य श्रीमद्भगवत्पाद योगीन्द्र यांचें चरित्र भविष्योत्तरादि पुराणांतून, व ज्ञानामृत-शिवरहस्यादि पुरातन इतिहासामधून विशेष विस्तारानें आलेलें आहे. तसेंच इतर पुष्कळ ठिकाणीं त्यांच्या अवताराचा व अवतारकार्याचा उल्लेख आलेला आहे. कारण श्रीमच्छंकराचार्य कलियुगांतील अद्वैतसंस्थापक आचार्य—युगाचार्य असून, युगधर्मानुरूप सद्धर्मनियमनार्थ ज्या अधिकारिक विभूति पूर्व नियत आहेत, त्यांपैकींच ते एक होत. त्यांचें चरित्र त्यांच्यानंतर होऊन गेलेल्या पुष्कळ निबंधकारांनीं ग्रथित केलेलें आहे, पण त्याचा मूळ चरित्राशीं बराच विसंवाद असल्याचें दिसून येतें, व त्याचें कारणहि वर दिलेलेंच आहे. तथापि मागें उल्लेखिलेल्या कांची पीठेशकृत—'वेदान्त पंचप्रकरणीं'तील श्रीमदाचार्य चरित्र मात्र आर्ष शंकरविजयाशीं बरेंच जुळतें आहे, अस्तु.

श्रीशंकराच्या तिसऱ्या वर्षीच त्यांचे वडील 'शिवगुरु' दिवंगत झाले. नंतर पांचवे वर्षीं उपनयन होऊन गुरूगृहीं श्रीशंकराचें वेदाध्ययन पूर्ण झालें. ब्रह्मचर्याश्रम-धर्म-परिपालन आणि मातृसेवा यांत कांहीं काल गेल्यानंतर श्रीशंकरांनीं पुढील अवतारकृत्य ध्यानीं आणून 'सर्वसंन्यास' करण्याविषयीं मातुश्रींचीं आज्ञा मागितली. वृद्धावस्थेंतील एकुलता एक सर्वसद्गुणसंपन्न आणि स्वतःची असहाय्य स्थिति अशा प्रसंगीं कोणत्या प्रेमळ मातुश्रींकडून एवढ्याशा लहान वयांत मुलाला सर्व संन्यास करण्याची आज्ञा मिळणार ? अर्थात्च श्रीमदाचार्यांनीं—सरळरीतीनें आज्ञा मिळणें नाहीं असें जाणून—एके दिवशीं मातेसह स्नानास गेले असतां योगबलानें मायानक्र उत्पन्न केला, आणि त्यानें आपला पाय धरिला असून सर्वसंन्यास केल्यावांचून यांतून आपण मुक्त होत नाहीं' असा आक्रोश चालविला. हें पाहून त्या पुत्रवत्सल मातेनें विचार केला कीं, 'या नक्राच्या योगानें माझ्या पुत्राला आजच मृति येण्यापेक्षां,

संन्यासस्थितींत कां होईना माझा बाळ कोठें तरी कुशल असेल ना ? मग याच्या या संकल्पाचें आड तरी मी का यावें ? व उद्यांची आपत्ति आजच कां ओढवून घ्यावी ? असें ह्मणुन त्यांनीं श्रीशंकरांना त्यांच्या इच्छेप्रमाणें संन्यास करण्याची आज्ञा दिली झालें! तत्क्षणींच मायानक्र अंतर्धान पावला. व श्रीशंकरहि माया-नक्राचें जबड्यां ून मुक्त झाले, आणि तेथेंच प्रेषोच्चार, मात्र संन्यास करून व मातुश्रींचें समाधान करून श्रीशंकर सद्‌गुरुशोधानार्थ उत्तरेकडे निघाले. कारण सद्गुरूवांचून सत्संप्रदाय प्राप्ति नाहीं व त्यावांचून यथार्थ ज्ञानोत्पत्तीचा संभवच नाहीं. उलट नुसत्या तर्कानें श्रुतार्थहानी आणि अश्रुतकल्पनाच मात्र होते, असा शास्त्रांचा सिद्धांत आहे, व आप्तजनांचा अनुभवहि आहे.सामान्य व्यवहारांत सुद्धां शब्दज्ञानापेक्षां अनुभवाचीच आवश्यकता अधिक असते. सद्धर्म संप्रदायाचें एवढें महत्व व आवश्यकता असतां ' सांप्रदायिक आग्रह ' ' आकुंचितदृष्टी ' इत्यादि प्रकारचे आक्षेप त्याच्या विरुद्ध उत्पन्न होतात. याचे कारण त्याच्या यथार्थ स्वरूपाची जाणीव असावी तशी नसते हें होय. आणि दुसरें, असे आक्षेप उत्पन्न होण्याला जे परस्पर विरुद्ध नानाप्रकारचे संप्रदाय भेद कारण होत असतात त्यांविषयीं एक गोष्ट मुळींच लक्ष्यांत घेतली जात नाहीं, ती ही कीं, मूल सनातन धर्मसंप्रदायाला सोडून जे हे भिन्न भिन्न मार्ग प्रवृत्त केले जातात तेच मुळीं भिन्न अथवा विरुद्ध तर्क वा हेतुवाद यांच्या जोरावर केले जातात, म्हणजे ज्यांचा उगम श्रुतार्थाची हानि करून अश्रुत कल्पनेच्या आग्रहांत केला जातो, ते सत्संप्रदाय कसे ? एकाद्या मताचा आग्रहानें पुरस्कार करणारा या दृष्टीनें हवें तर त्याला 'संप्रदाय' असें लाक्षणिक अर्थानें म्हणावें. खरा शुद्धसंप्रदाय—यथार्थज्ञानाला पूर्णपणें साधक असा संप्रदाय श्रुति-स्मृति-प्रमाणसिद्ध एक सनातन वैदिक धर्मसंप्रदायच होय. त्याच्या प्राप्तीकरिताच 'श्रीमदाचार्य' उत्तरेकडे निघाले.

मातेची आज्ञा घेऊन यतिराज श्रीशंकराचार्य जे निघाले ते थेट बदरिकारण्यांत गेले व येथील तपस्वी जनांच्या सांगण्यावरून श्रीगौडपादयोगीन्द्राच्या आश्रमस्थानाजवळ जाऊन त्यांचें स्तवन करितें झाले.तें ऐकून श्रीगौडपादांच्या आज्ञेनें त्यांचे शिष्य गोविन्दपाद योगीन्द्र बाहेर आले. तोंच अत्यंत तेजस्वी व बाळयतिवेष पाहून त्यांना अत्यंत आश्चर्य वाटलें, व त्यांनीं श्रीशंकराचार्यांना प्रश्न केला कीं, हे बालयते तूं कोठून आलास ? एवढ्या लहान वयांत हा संन्यास

वेष धारण करून अशा भयंकर अरण्यांत कशाकरितां आलास ? हे सांग.' त्यावर श्रीमदाचार्य ह्मणाले, 'भगवन् मी केरळदेशीय आहे, सर्व मायामय हें विश्व मिथ्याभूत जाणून ज्ञानमार्गाचेंच केवळ संपादन करण्याकरितां परम पवित्र हा संन्यासवेष धारण केला आहे व आत्महितार्थ ज्ञानमार्गाचें सांगोपांग संपादन करावें ह्मणून श्रीशिवाज्ञेनें श्रीगौडपाद योगीन्द्रांना शरण आलों आहें. तरी कृपा करून ही माझी प्रार्थना श्रीगुरु गौडपाद योगीन्द्रांचे चरणीं निवेदन करावी' असें ऐकून श्रीगोविन्दपादांनीं ती सर्व हकीकत श्रीगौडपादचरणीं निवेदन केली व त्यांच्या आज्ञेनें श्रीशंकरांना गुहेंत नेलें. आंत गेल्यावर अनेक सिद्धयोग्यांसह व्याघ्रांबरावर बसलेल्या श्रीगुणेशांशभूत गौडपादांना पाहून श्रीशंकरांनीं अत्यंत प्रेमभावानें त्यांना साष्टांग नमस्कार केला. आणि लौकिक रीतीला अनुसरून मायामय संसारापासून मुक्त करून कृतार्थ करण्याविषयीं प्रार्थना केली. त्यावर श्रीगौडपादयोगीन्द्र संतुष्ट होऊन ह्मणाले 'बा बालयते शंकरा, तुझ्या आगमनानें आम्हांला अत्यंत आनंद झाला आहे. कारण श्रीव्यास व शुक यांच्या आज्ञेनें आमचें येथील वास्तव्य तुझ्याकरितांच आहे. तूंही श्रीशंकरांशानेंच उत्पन्न झाला असून प्रस्तुत कलिकालांत वाढलेल्या दुर्मतांचें खंडण करून अद्वैतांचें स्थापन करण्याकरितां व शिष्यपरंपरा—क्रमादिद्वारा पुढें युगाचार्यक्रमाला अनुसरून त्याचें रक्षण करण्याकरितां तुझी योजना झाली आहे. हेंही श्रीशिवाज्ञेनें आम्ही जाणीत आहों. तरी पुढील आमचे भाषण सावधान श्रवण करून, त्याचप्रमाणें अद्वैताची स्थापना तूं कर !' श्रीगौडपाद सांगतात—' पूर्वी द्वापारयुगाचे शेवटीं श्रीविष्णूंनीं वेदव्यासरूपानें अवतीर्ण होऊन सर्वत्र अद्वैतसिद्धान्त स्थापन केला. त्यांच्या सिद्धान्त-प्रस्थानांत दशोपनिषदें, ब्रह्मसूत्रप्रबंध ( ब्रह्म व देव कांडासह ) आणि षडद्वैतसिद्धांत बोधक दशगीतामय—योगामृत शास्त्र, हें ग्रंथ आहेत. हल्लीं कलियुगांतील लोक युगमानाप्रमाणें अति मंदाधिकारी व द्वैत-पाखंडादि मार्गानुगामी झाल्यामुळें अद्वैतसिद्धांतबोधक—अद्वैतमार्ग—प्रवेशभूत अशा सर्व साधारण स्मार्त सिद्धांताचें स्थापन करण्याकरितां, वरील श्रीव्यासप्रस्थानांतर्गत तृतीय प्रस्थानापैकीं फक्त भगवद्गीतेचें ग्रहण करून तूं आपलें प्रस्थान भाष्यासह लोकांत प्रवृत्त कर. तसेंच सर्वत्र दिग्विजय करून षण्मार्ग—सिद्धान्तासह अद्वैताचें स्थापन कर. आणि दिग्जयप्रसंगानें श्रीभूस्वानंद मोरेश्वर क्षेत्रांतील

शास्त्रप्रसिद्ध श्रीब्रह्मभूयमहासिद्धि पीठाचा उद्धार करून अधिकारी शिष्याकरवीं वैदिक षण्मार्ग तत्वत: पूर्णपणें प्रवृत्त राहतील अशी व्यवस्था कर.’ याप्रमाणें आज्ञा करून श्रीगौडपादयोगीन्द्रांनीं गोविन्दपादांकरवी त्यांना सविधि संन्यास-धर्मदीक्षा देऊन त्यांचें आश्रमनाम ‘भगवत्पाद’ असें ठेविलें. नंतर सविधि पंच-संस्कारपूर्वक वैदिक गाणेश समयदीक्षा देऊन श्रीगौडपादांनीं ब्रह्मभावासिद्धि-प्रापक श्रीस्वानंदेश एकाक्षरमंत्राचा उपदेश करविला.त्याचवेळीं जगद्गुरुयाकरितां व निर्विघ्नकार्यसिद्धीकरितां दीक्षापूर्व–विहित तिलकसंस्कारांगत्वानें ‘ श्री वल्लभेश ’ मंत्रही देवविला. महागणपति वा चिंतामणि—मंत्रानेंच ( वैदिक महागणपति मंत्रालाच वल्लभेश अशी संज्ञा आहे. ) शारदेचें आकर्षण केल्याचें वृत्त मठाम्नायांत सर्व-प्रसिद्धच आहे. मग विशेष व महाविशेषदीक्षा-सिद्धीकरितां अनुक्रमें स्वेष्टदेव व गुरुपूजनार्थ रत्नगर्भगणेशमूर्ति, आणि चंद्रमौलीश लिंग–श्रीशुकाकडून प्राप्त झालेलें देऊन श्रीगौडपादांनीं आचा-र्यांना स्वकृत मांडुक्यकारिकांसह सर्वसिद्धांतरूप महावाक्य प्रस्थानत्रयाचा उपदेश केला. सारांश आत्मकार्य व लोककार्य–सिद्धीकरितां अवश्य असलेले सर्व संस्कार श्रीमदाचार्यांना श्रीगौडपादांकडून–स्थूलरूपानें गोविन्दपादद्वारा व सूक्ष्मरूपानें प्रत्यक्ष असे–प्राप्त झाले.

श्रीमदाचार्य व गोविंदपाद यांच्या गांठीविषयीं लोकप्रसिद्ध चरित्रांत बराच फरक आहे, श्रीगोविन्दपादांची गांठ नर्मदेच्या कांठीं पडून त्यांच्या-कडून संन्यासादिकांची प्राप्ति झाल्यानंतर पुढें बदरीकारण्यांत श्रीगौडपादांचें दर्शन झालें असा उल्लेख आहे. पण पुढें दिलेल्या भविष्योत्तर ब्रह्मांडादि पुराणांतील व ब्रह्मानंद सुखोदयादि इतिहासांतील वचनांचा अर्थ लक्ष्यांत घेतला असतां, तो उल्लेख ‘ श्रीभगवत्पाद श्रीमदाद्य शंकराचार्य ’ यांच्या विषयींचा नसून दुसऱ्या कोणत्या तरी यतिश्रेष्ठांविषयीं असावासें दिसतें. मागें सांगितल्याप्रमाणें चारित्र्यसाम्यामुळें अवतारकालाविषयीं जसा घोंटाळा झाला, तसा प्रकार याविषयींही झाल्याचें संभवतें. नर्मदातटाकीं कोणा यति-वर्याकडून दुसऱ्या शंकराचार्यांचा संन्यास झाला असून शिवरहस्यादिकांत श्रीमदाचार्य-गुरु ‘ गोविन्दपाद ’ प्रसिद्ध असल्यामुळें तेच हे गोविन्दपाद असावेत अशी कल्पना झाली असली पाहिजे, हें उघड आहे. श्रीगौडपाद-योगीन्द्रांकडूनच गोविन्दपादद्वारा श्रीमदाचार्यांना अद्वैत सिद्धांतादिकांची प्राप्ती झाल्याबद्दलची वचनें येणेंप्रमाणें:—

संन्यस्य काननं प्राप बदरिकाश्रममुत्तमम् ॥
उपदेशं प्राप शुकात्स्वयं श्रीगौडपादकः ॥ १ ॥
रत्नगर्भं गणेशानं पुपूज मुनिसत्तमः ॥
चंद्रमौळीश्वरे लिंगे स्वगुरुं शुकयोगिनम् ॥ २ ॥
शिवरूपं पुपूजैव भक्तिभाव-पुरःसरम् ॥
शांतियोगं च संप्राप गौडपादो मुनीश्वरः ॥ ३ ॥
मांडूक्योपनिषदश्चकार कारिकां वराम् ॥
शांतियोगप्रदां पश्चाच्छंकराय ददौ च ताम् ॥ ४ ॥
शंकरागमनांतं च तस्थौ तत्रैव योगिराट् ॥
गोविन्दपादयतिना कारयित्वोपदेशकम् ॥ ५ ॥
स्वपूजितं गणेशानं चंद्रमौलिश्वराभिधम् ॥
लिंगं च दापयामास ब्रह्मलोकमगात्स्वयम् ॥ ६ ॥

भविष्योत्तर पुराण, पंचगुरु महात्म्य. त्याच पुराणांत पुढील अध्यायांत.

गौडपादशासनेन गोविन्दपादसंज्ञकः।
उपदेशं चकारास्य० ! ॥ १ ॥

ब्रह्मांड पुराणांत पुढील वचनें आहेत—( पूर्वखंड. )

शंभोरंशसमुद्भूतस्त्रिसाहस्रे गते कलौ ॥
भगवत्पादयोगीन्द्रो गौडपादस्य शासनात् ॥ १ ॥
वैय्यासिक्यानां सूत्राणां चकार भाष्यमुत्तमम् ॥ इति

पुढें दिग्विजय प्रसंगानें गाणपत मार्गी गिरिजासुतांशीं वाद झाल्यानंतर श्रीमदाचार्यांनी त्यानां गाणेशाद्वैत–संप्रदाय प्राप्त झाल्याची परंपरा सांगितली आहे. ती अशीः——

वेदव्यासाच्छुकः प्राप शुकाच्च गौडपादकः ॥
मया लब्धाश्च तस्माद्वै तुभ्यं दास्ये न संशयः ॥ १ ॥

तसेंच—

" अघोरो मुख्य मंत्री तु शंकरस्य परात्मनः ॥
केरळे तु शलग्रामे शांभवस्य द्विजन्मनः ॥ १ ॥
पुत्रो भूत्वा सप्तमाब्दे गत्वाच बदरीवनम् ॥
तुष्टाव गौडपादं तं गोविंदाख्येन संयुतम् ॥ २ ॥ इ. इ.

श्रीब्रह्म. सुखोदये ।

पुढें व्यासोपाख्यानप्रसंगानें श्रीगौडपाद व्यासाज्ञेनें गुहेंत राहिल्याचें सांगून--

संन्यासं चापि शास्त्रं च दत्त्वा च शंकराय च ॥
सिद्धिं प्राप गौडपादो गणकांशसमुद्भवः ॥ १ ॥
एवं वै द्वापरांते तु संभूतो बादरायणः ॥
कलौ तु विजयं कृत्वा विष्णोरंशसमुद्भवः ॥ २ ॥
शंकरस्यावतारांतं ररक्ष भारतं वरम् ॥

असें सांगितलें आहे. आणखी अशाच अर्थाचे उल्लेख पुष्कळ ठिकाणीं आलेले आहेत, विस्तारभयास्तव येथें सर्वांचाच संग्रह करितां येत नाहीं.

या एकंदर मजकुरावरून पूर्व युगाचार्यांनीं द्वापरान्त कालापर्यंत ज्याचें प्रस्थापन व पालन केलें, कलियुगारंभीं श्रीवेदव्यासांनीं भारतवर्षांत दिग्विजय करून जो पुनः प्रवृत्त केला व श्रीगौडपादांनीं ज्याचें रक्षण केलें, तोच सनातन वैदिक धर्मसंप्रदाय-षण्मार्गसिद्धान्तरूप अद्वैतसंप्रदाय-श्रीमदाद्यश्री-शंकराचार्य-श्रीभगवत्पादयोगीन्द्रांना यथाक्रम-प्राप्त झाला असल्याचें ठरत आहे. अस्तु !

याप्रमाणें श्रीगौडपादयोगीन्द्रमहाराजांकडून षडद्वैत सिद्धान्त-संप्रदाय, आत्म व लोकलाभार्थ सविधि-सांग-स्वानंदेशोपास्तिमार्ग, आणि पुढील कार्यनिर्वहणाविषयीं आज्ञा हीं प्राप्त झाल्यानंतर श्रीमदाचार्य प्रथम देवतानुग्रह प्राप्तीकरितां ' श्रीश्वेत विघ्नेश ' क्षेत्रामध्यें आले.

(हें क्षेत्र दक्षिणेंत कुंभकोणाजवळ कावेरी नदीचें कांठीं आहे. समुद्रमंथनाच्या वेळीं भगीरथ प्रयत्न करूनही जेव्हां अमृत निघण्याचें चिह्न मुळींच दिसेना, तेव्हां ब्रह्मदेवप्रभृति सर्व देवांनीं अमृताच्या प्राप्तीकरितां जलांतर्यामी परमात्म्याची स्तुति केली. तिनें संतुष्ट होऊन परमात्म्यानें दिव्यरूपानें प्रकट होऊन दर्शन दिलें. तोच श्वेतविघ्नेश म्हणून शास्त्रप्रसिद्ध आहे. पुढें त्याच्या कृपेनें अमृत निघालें. तेव्हां प्रथम त्या अमृताची ' श्रीश्वेतविघ्नेश ' मूर्ती करून ब्रह्मदेवानें सर्व देवांसह तिची पूजा केली. ती मूर्ती कांहीं काळ इंद्राजवळ राहून पुढें लोकोद्धारार्थ भूमीवर कावेरी नदीचे तीरावर स्थिर झाली तेंच श्रीश्वेतविघ्नेश क्षेत्र होय. अशी कथा पुराणप्रसिद्ध आहे. या ठिकाणीं ' श्रीहेरंड महर्षींचा ' आश्रम असल्याचें वर्णन आहे. पूर्वी त्रेतायुगामध्यें श्रीब्रह्मभूय महासिद्धि पीठेश ' श्रीमन्मुद्गलाचार्य ' यांनीं ज्यावेळीं सर्वत्र

दिग्विजय करून सद्धर्म संप्रदाय स्थापन केला. त्यावेळीं त्याच्या रक्षणाकरितां देश भेदानें ज्या ज्या शिष्यांना स्थापन केलें, त्यांपैकीं कृष्णा नदीच्या दक्षिण भागांमध्यें ' श्रीहेरंड महर्षीनां ' स्थापन केलें. ज्या ज्या वेळीं कालगौरवामुळें शुद्धसंप्रदायाचा लोप होत असतो, त्या त्या वेळीं अशा सिद्धांच्या कृपेनेंच अधिकारी जनांकडून ग्रंथादिकांच्या द्वारें तो संप्रदाय पुनः पुनः प्रकट होत असतो.)

श्रीशंकरांश भगवान श्रीमदाद्य शंकराचार्य यांनीं श्रीश्वेतविघ्नेशासमीप प्रथम श्रीस्वानंदेश कृपा संपादनाकरितां चतुर्दीक्षानुष्ठान विधानानें श्रीस्वानंदशैकार्ण मंत्राचें पुरश्चरण करून, नंतर श्रीवल्लभेशमंत्रानुष्ठानही यथाविधि सांग संपादन केलें, आणि अशा रीतीनें श्रीश्वेतविघ्नेशकृपेनें निग्रहानुग्रह सामर्थ्य प्राप्त करून घेऊन श्रीमदाचार्य दुर्मतखंडनपूर्वक अद्वैतसिद्धांत स्थापन करण्याकरितां निघाले.' कोणतेंही ल्हान अथवा मोठें कार्य करण्याची इच्छा धरणाऱ्या पुरुषानें, तें निर्विघ्नपणानें पूर्ण सिद्ध व्हावें, याकरितां ' श्रीगणेश कृपा ' संपादन करणें अत्यंत अवश्य आहे, असा शास्त्रीय नियम आहे. किंबहुना श्रीगणेश कृपेवांचून त्या त्या कार्यसिद्धीला अवश्य असलेली सत्ता—सामर्थ्य प्राप्त होत नसल्यामुळें विष्णु शिवादि ईश्वरांनींसुद्धां आपआपल्या कार्यसिद्धीकरितां श्रीगणेशकृपा संपादन केल्याचें सर्व शास्त्र-प्रसिद्ध आहे. हीच गोष्ट श्रीमदाचार्यांनीं स्वतःच्या आचरणानें सिद्ध केली असून, पुढील पीठस्थांना—लोकानुशासन—कार्य सिद्धीकरितां—ती उपदेशिली आहे.

श्रीमदाचार्यांच्या लोकप्रसिद्ध चरित्रांत वरील आर्षेतिहासप्रसिद्ध मुख्य गोष्टीचा उल्लेख स्पष्टपणें कोठें आलेला आढळत नाहीं, यामुळें पुष्कळांना त्याविषयीं मोठा संदेह वाटतो. परंतु मुख्य पीठस्थ आचार्यांकडे चालत आलेली ' श्रीरत्नगर्भ ' गणेशपूजा ही वरील गोष्टीचें मुख्य व प्रत्यक्ष प्रमाण आहे. शिवाय श्रृंगेरी व कामकोटी येथील प्रस्तुतच्या पीठेशांचें[1] अगोदर असलेल्या पीठस्थ आचार्यांना आपल्या नित्य क्रमाबरोबर श्रीगणेशमंत्रजप निग्रहानें करावा लागत असे. ही गोष्ट तिकडे प्रसिद्ध असून श्रृंगेरीपीठांत कांहीं काल राहिलेल्या गृहस्थांकडूनही आम्हांस कळलेली आहे. श्रीमदाचार्यांनीं चिंतामणि मंत्रानें सरस्वतीचें आकर्षण केल्याची हकीकत मठाम्नायांत प्रसिद्धच आहे. श्रीमदाचार्यांना श्रीगौडपादयोगीन्द्रांकडून प्राप्त झालेला

---

१ प्रस्तुतच्या पीठेशांबद्दल प्रत्यक्ष माहिती कळलेली नाहीं.

श्रीवल्लभेशमंत्र आकर्षणमंत्र म्हणून प्रसिद्ध आहे. श्रीमदाद्य शंकराचार्यकृत 'श्रीगणेशभुजंग' नामक एक स्तोत्र आहे. तें शतश्लोकात्मक असून त्यांत श्रीगणेशाचे स्वरूप पूर्ण वर्णन केलेलें आहे. त्यापैकीं एक श्लोक 'कामकोटी' कडील लोकांचे म्हणण्यांत असलेला असा आहे.[१]

अशुण्डालवक्त्रादविघ्नाधिनाथा
दलम्बोदरादाखुवाहादखर्वात् ॥
सदाऽनिर्गुणत्वादिहानेकदत्वा
दहं देवमन्यं न सेवे न सेवे ॥ १ ॥

या श्लोकांत श्रीगणेशाचीं 'गजवक्त्र' चिह्नमूलक प्रत्यक्ष तत्वमसिमयत्व, विघ्ननाथ असल्यामुळें सर्व सत्ताधीशत्व, सर्वाधारत्व, सर्वव्यापकत्व, केवळ प्रणव हेंच त्याचें स्वरूप असल्यामुळें प्रत्यक्ष ब्रह्मत्व, आणि मायाधीशत्व हीं सार्वभौमचिह्नें स्पष्टपणें दर्शविली असून, तीं चिह्नें एका गणेशांचून दुसऱ्या कोणाचींच नसल्यामुळें ब्रह्मप्राप्त्यर्थ तोच उपास्य असल्याचें स्वानुभवावरून सांगितलें आहे.

---

१ दुसऱ्या देवतांचींही दुसरीं कित्येक स्तोत्रें 'श्रीमदाद्य शंकराचार्य' कृत म्हणून प्रसिद्ध आहेत त्यांतीलच हें एक असून तें आद्य 'शंकराचार्य' कृत नसेल अशीही कोणाला शंका येईल, पण मागील त्यांच्या चरित्रभागाकडे लक्ष्य देतां ती शंका सहज निरस्त होईल. चार वर्षांपूर्वी येथें श्री. ब्र.गा. व. 'श्रीअंकुशधारी' महाराजांकडे कांहीं 'अनुपलब्ध' ग्रंथाचा शोध करण्याकरितां एक शास्त्रीमहाशय आले होते. ते द्रविडांतील राहणारे असून 'बडोदा सेंट्रल लयब्ररी'चे एजंट आहेत. ( त्यावेळीं तरी होते ) त्यांचेजवळ जर्मनींतील एका मोठ्या × × × ग्रंथसंग्रहांत हिंदुस्थानांतून संग्रहीत केलेल्या ग्रंथांची एक सूची-ह्मणजे छापलेलीं भली मोठी तीन पुस्तकें-होतीं तीं पहाण्यांत आलीं वर्णानुक्रमानें ग्रंथाचें नांव, विषय, संख्या, ग्रंथ कर्त्याचें नांव आणि मिळाल्यास काल असा त्या सूचीचा क्रम आहे. त्यांत वरील 'गणेशभुजंगा'चा उल्लेख असून तें शंकराचार्यकृत व शत ग्रंथयुक्त असल्याचें स्पष्ट लिहिलें आहे. याशिवाय ज्या एका ग्रंथाविषयीं हल्लीं 'आनंदाश्रम' (पुणें ) छापखान्यांत छापिलेल्या सभाष्यगणेशाथर्वशीर्ष पुस्तकाच्या प्रस्तावनेंत 'अनेनैव भाष्यकृता सर्वसारानिर्णयाख्यो एको ग्रंथः कृतः' असा उल्लेख आलेला आहे, व विद्वान् शास्त्री बोवांनीं 'सोऽस्माभिर्न दृष्टः' असें मोठ्या आढ्यतेनें म्हटलें आहे, तो 'सर्वसारनिर्णय' ग्रंथ एकवीस प्रकरणांनीं युक्त व गणेश योगीन्द्र कृतः असल्याचे वरील सूचींत नमूद आहे आमच्या इकडील संशोधकांना मात्र अशा गोष्टींची दादही असल्याचें दिसत नाहीं ।

येथपर्यंतच्या एकंदर प्रमाणांवरून व आचार्यपीठांतील 'दीक्षाध्वज' निदर्शक नित्यक्रमावरून श्रीमदाचार्यांच्या 'स्वानंदेशोपास्ति' विषयीं शंका उरत नाहीं. पूर्णब्रह्माची प्राप्ति म्हणजे ब्रह्मसायुज्य मिळणें हेंच प्राणिमात्रांचें इतिकर्तव्य आहे, व तें त्याच्या ज्ञानानें म्हणजे साक्षात्कारानेंच पूर्ण होणें शक्य आहे.' निर्मल व निश्चल बुद्धीच्या ठिकाणीं होणारा स्व-स्वरूप प्रकाश' म्हणजेच ज्ञान होय. अशी ज्ञानाची व्याख्या केलेली आहे. अर्थात् मल-विक्षेपादि दोषांनीं आवृत असलेल्या बुद्धीमध्यें तसा प्रकाश होणें शक्य नाहीं. म्हणून कर्मोपासनादि साधनें सांगितलीं आहेत. साक्षाद्ब्रह्म निरालंब असल्यामुळें उपास्य होणें शक्य नाहीं. व स्वावलंबनाची सिद्धी झाल्याशिवाय निरालंब प्राप्तीही होणार नाहीं. याकरितां विश्वामध्यें सत्तारूपानें व्याप्त असलेल्या ब्रह्माचें स्वरूप वेदांनीं पांच प्रकारचें सांगितलें आहे, व तेंच उपास्य आहे. तें सत्तावैशिष्ट्यानें विष्णु, शिव, शक्ति, सूर्य व गणेश, या नामांनीं व त्यांचा अर्थ व्यक्त करणाऱ्या रूपांनीं युक्त असल्याची श्रुति आहे. या पांचांपैकीं ज्येष्ठराजत्व व ब्रह्मणस्पतित्व एका गणेशाचेंच वर्णिलेलें असल्यामुळें, व सर्व नामरूपात्मक विश्वाला मूळ असलेल्या ॐकाराचें पूर्ण लक्ष्य तोच असल्यामुळें, ब्रह्मसायुज्यसिद्धीला श्रीगणेशोपासनच मुख्य साधन असून, तिच्या सिद्धीकरितां इतर उपासना सांगितल्या आहेत. प्रणवाकृति हें गणेशाचें बाह्यस्वरूप असून बुद्धिगूढत्व-बुद्धिप्रेरकत्व हें अंतःस्वरूप आहे. 'ब्रह्माचा वाचक प्रणव आहे.' 'ब्रह्मप्रतीक प्रणव आहे, त्याचेंच उपासन करावें.' अशा अर्थाचे उल्लेख श्रुतीमध्यें आहेत. तात्पर्य सर्वेश्वरादि निरु-पाधिक उपाधींनी व्यक्त होणारा व सगुण-निर्गुणाभेद अशा गजवक्त्ररूपानें योग्यांनाही ध्येय असणारा परमात्मा स्वानंदेशच ब्रह्मनिष्ठांचा उपास्य अस-ल्यामुळें, श्रीमदाचार्यांचें उपास्य तोच होय, हें निर्विवाद आहे.

'श्रीशंकराचार्य केरळ देशांत अवतीर्ण होऊन बालपणांतच संन्यास घेऊन सद्गुरुशोधनार्थ बदरिकारण्यांत गेले व श्रीगौडपादांकडून वा गोवि-न्दपादांकडून अद्वैतसंप्रदाय संपादन करून सर्वत्र प्रवृत्त केला.' ही गोष्ट पुराणेतिहासगत व लोकप्रसिद्ध आचार्यचरित्रांत स्पष्टपणें नमूद आहे. श्रीम-दाचार्य अगदीं दक्षिणेकडून अगदीं उत्तरेकडे सहज गतीनेंच गेले कीं कांहीं विशेष कारण घडलें, याविषयीं स्पष्ट असा उल्लेख कोठें असल्याचें आढळत नाहीं. कोठें कोठें श्रीशिवाज्ञेविषयींचा मोघम निर्देश आहे याविषयींचा विशेष

खुलासा मारीच पुराणांतील श्रीमायूरक्षेत्र माहात्म्य खंडांत आलेला आहे. तो अत्यंत बोधप्रद असून पंचगुरुपरंपरेशी सुसंबद्ध असल्यामुळें पुढें दिला आहे.

भारतीय युद्धानंतर श्रीवेदव्यासांनीं सर्वत्र दिग्विजय करून अद्वैतसंप्रदाय स्थापन केला; व त्याच्या रक्षणाकरितां या भारत वर्षांत विंध्याद्रीच्या दक्षिणेकडे द्रविडपादाचार्यांना व उत्तरेकडे गौडपादाचार्यांना नियोजित केलें. त्याच वेळीं त्या उभयतांना अशी आज्ञा केली कीं, ' द्रविडपादांनीं श्रीशंकरावतार झाल्याचें श्रवण होईपर्यंतच भूमीवर राहून अधिकारी जनांना ज्ञानोपासनादि मार्गाचा बोध करावा, व गौडपादांनींहि त्याप्रमाणेंच करून श्रीशंकरानां सर्व संप्रदाय द्यावा' तिला अनुसरून श्रीद्रविडपादाचार्य विज्ञान[1] क्षेत्रांत राहिले, व श्रीशंकरावतार झाल्याचें श्रवण करितांक्षणींच अंतर्धान पावले. आणि श्रीगौडपादाचार्य बदरिकारण्यांतील गुहेंत राहिले इत्यादि, वृत्त मागें आलें आहेच.

मातेच्या अनुज्ञेनें संन्यास केल्यानंतर, ' अद्वैतसंप्रदायप्रवर्तक व श्रीशुकशिष्य द्रविडपाद योगीन्द्र विज्ञानक्षेत्रांत राहत असून अधिकारी जनांना ते ज्ञानोपदेश करीत असतात ' या लोकवार्तेला अनुसरून शंकराचार्य द्रविडपादांना शरण जण्याकरितां निघाले. पुढें श्रीद्रविडपादाचार्य सिद्धिंगत झाल्याचे ऐकून आचार्य फिरत फिरत श्रीमोरेश्वरक्षेत्रीं आले. त्यावेळीं श्रीमोरेश्वराचे शास्त्रप्रसिद्ध वैभव प्रकट असून त्याचें क्षिप्रसिद्धिदत्व विशेष प्रसिद्ध होतें.

श्रीमदाचार्यांनीं द्वारयात्राविधानानें श्रीमयूरेश्वराचें पूजन करून स्तवन केलें. त्यावेळीं पुढील कार्याविषयीं सूचक अशी आकाशवाणी झाली.

' शुकशिष्यो महायोगी गौडपादेति विश्रुतः ॥
यतीन्द्रो ब्रह्मवेत्ता तु गुहायां बदरीवने ॥ १ ॥
तिष्ठति योगनिरतो बहुशिष्यनिषेवितः ॥
तत्र गत्वा च तस्मात्त्वमुपदेशं गृहाण च ॥२॥
तदाज्ञा—मार्गतस्त्वं तु वेदवेदांतसंमतम् ॥
अद्वैतमार्गमतुलं संस्थापय धरातले ॥३॥ ''

'शुकाचे शिष्य श्रीगौडपाद यतीन्द्र बदरिकारण्यांत निवास करीत आहेत. त्यांना शरण जाऊन त्यांचेकडून उपदेश गृहण कर; आणि त्यांच्या आज्ञेप्रमाणें अद्वैतमार्गाची स्थापना कर' असा वरील वचनांचा भावार्थ आहे.

---

१ निजामस्टेटमध्यें गोदावरीचे कांठीं ' राक्षसभुवन ' म्हणून एक गांव आहे तेच विज्ञानक्षेत्र असून श्रीदत्तात्रेयांना तेथें श्रीगणेशदर्शन होऊन ज्ञान मिळाल्यामुळें ते विशेष प्रसिद्ध आहे.

त्या व्योमवाणीरूप श्रीमयूरेशाच्या आज्ञेवरून श्रीमच्छंकराचार्य बदरिकारण्यांत गेले. पुढील संन्यास, मंत्रोपासना, अद्वैतग्रंथादि-परम्परा इत्यादिकांच्या प्राप्तीची हकीगत मागें आलेलीच आहे. श्रीगौडपादांच्या आज्ञेप्रमाणें लोकव्यवहारसिध्यर्थ श्रीश्वेतविघ्नेशक्षेत्रीं नित्यानुष्ठानपूर्वक वल्लभेश-मंत्राची सिद्धि प्राप्त करून घेतल्यानंतर पूर्ण-शांतिसिध्यर्थ श्रीमदाचार्य मयूरेश-क्षेत्रीं आले. तेथें नित्य श्रीकरागंगेंत स्नान करून नित्ययात्राविधानानें श्रीमयूरेशाचें-सेवन श्रीशंकराचार्य श्रीभगवत्पादयोगीन्द्र–करीत असत. नंतर वल्लभेश महामंत्र पूर्वक श्रीस्वानन्देश-महामन्त्र-जपानुष्ठान सांग संपादन करीत असत. याप्रमाणें एक वर्ष पूर्ण होतांच आचार्यांना भगवान् श्रीमयूरेशाचें साक्षात् दर्शन झालें. मयूरेशाचें दर्शन होतांच त्यांच्या कृपावीक्षणानें आचार्यांच्या निर्वाणान्त सर्व संस्कारांची सिद्धि होऊन त्यांना अखंड असंप्रज्ञात-समाधिसिद्धीचा लाभ झाला. श्रीमदाचार्यांनीं श्रीमयूरेशाचें 'भुजंग' स्तोत्रानें स्तवन केलें. नंतर श्रीमयूरेश पुढील कार्याविषयीं आज्ञापक स्वरूपाचें भाषण करिते झाले. 'हे श्रीशंकरांशभूत, भगवत्पादयोगीन्द्रा सांप्रत कलिकालाच्या अतिशय जोरामुळें बौद्धादिमार्गानुयायी लोकांनीं वेदमार्ग व वैदिक ग्रंथ प्रायः नष्ट केले आहेत; व वेदविरुद्ध अधर्ममार्गाची फारच वृद्धि झाली आहे. तिच्या निग्रहाकरितां कुमारिलभट्ट प्रभृतींनीं वर्णाश्रमधर्मपुरस्सर कर्ममार्गाची प्रवृत्ती केलेली आहे; तथापि वैषयिकसुखाला लाचावलेले बरेचसे लोक बौद्धमार्गाविषयींच मोठा आदर धरून बसले आहेत. विधि-निषेधरूप वस्त्राचा त्यांनीं त्याग केलेला असल्यामुळें त्यांना 'नग्न' अशी संज्ञा आहे. अशा नग्न लोकांपैकीं कांहीं वंचकांचा ऐहिक-फलद मंत्रसिद्धि-प्रभाव पाहून वैदिकलोक ही त्यांनाच अनुसरतात. कारण शाश्वत सुखापेक्षां अशाश्वत अशा ऐहिक सुखाकडेच त्यांची प्रवृत्ती कालदोषामुळें सहज होते, आणि त्या नग्नांच्या वाक्यावर विश्वास ठेऊन क्षुद्र-मंत्राच्या सिद्धिकरितां अनुत्तम व सर्वश्रेष्ठ-फलद अशा वैदिक-मंत्रांचा व तत्साधक मार्गाचा त्याग करण्यास ते तयार होतात. या योगानें अर्थातच तंत्रमार्गाची व क्वचित् पाषण्ड मार्गाची प्रवृत्ती फारच झालेली आहे. इला आळा घालण्याचें कार्य कर्मकाण्डीयांकडून होणें शक्य नाहीं व तसें तें झालेंही नाहींच. तरी, आतां तूं दिग्जय यात्रा-क्रमानें सर्वत्र

भारत-देशांत पर्यटन करून अद्वैत सिद्धान्त पूर्वक वैदिक षण्मतांचें यथाधिकार स्थापन कर. तसेंच कर्मैकदेशप्राधान्यानें जो हा वर्णाश्रमाचार प्रवृत्त झाला आहे त्याचें ज्ञानसाधक यथार्थ स्वरूप प्रगट करून तोही रक्षण कर.

हें मोरेश्वर-क्षेत्र सनातन वैदिक-धर्म-संप्रदायाचें प्रवर्तक मूळ—गुरु-पीठ म्हणून प्रसिद्ध असून तें द्वापरान्तापर्यंत प्रगट स्थितींत होतें, हें ब्रह्मभूयान्त सर्वसिद्धी देणारें असून त्याला 'श्रीब्रह्मभूयमहासिद्धीपीठ' अशी संज्ञा आहे. हल्लीं कलियुगांत हें पीठ कचित् लुप्त तर कचित् प्रगट अशा स्थितींत रहावयाचें असतें. प्रस्तुत गाणपतादि सर्वही मार्ग केवळ तान्त्रिकच उरले आहेत. माझ्या आज्ञेप्रमाणें वैदिकषण्मार्गांचें स्थापन केल्यानंतर त्यांचें रक्षण करण्याकरितां या पीठाचा उद्धार करून या ठिकाणीं कोणी अधिकारी शिष्य त्वां स्थापन करावा. कलियुगाचार्यत्व तुझ्याकडेच असून तुझ्यानंतर असा धर्मस्थापक मुख्य अवतार होणें नाहीं. अर्थात् या पुढें षण्मत संप्रदाय-प्रवृत्तीची जबाबदारी या पीठावरच रहाणारी असून ती माझ्या कृपेनें पूर्ण होईल." याप्रमाणें भाषण करून श्रीमयूरेश मयूरेशमूर्तीमध्यें अंतर्हित झाले. श्रीशंकरानांही मोठा आनंद झाला. व ते श्रीमयुरेशानुज्ञा घेऊन दिग्विजयार्थ निघाले. हा उल्लेख 'बृहन्मारीच' संज्ञक कल्पपुराणांतील तृतीयसंहितान्तर्गत श्रीमन्मयूरेशक्षेत्र महात्म्याच्या—चौसष्टाव्या अध्यायांत आलेला आहे.

## २.

## दिग्विजय व षण्मतस्थापन.

श्रीमदाचार्य दिग्जयाकरितां निघाले, ते प्रथम काशीस येऊन राहिले. त्यांचें वैभव व ज्ञानसंपत्तिमत्व जाणून पुष्कळ अधिकारी द्विजश्रेष्ठ त्यांचे शिष्य झाले. क्रमानेंच श्रुति, युक्ति व तेज यांच्या प्रभावानें सर्वत्र प्रच्छन्नरूपानें पसरलेलें बौद्धमत व ब्राह्मणांच्या ठिकाणीं वाढलेले तांत्रमत यांचा श्रीमदाचार्यांनीं नाश केला. जे कोणी अति आग्रही दिसले त्यांना राजाकडून हद्दपार करविलें. त्याच वेळीं कांहीं तांत्रिकांना श्रीमदाचार्यांपुढें वादविवादांत आपली डाळ मुळींच न शिजल्यामुळें मोठा क्रोध आला. त्या क्रोधाच्या भरांत त्यांनीं श्रीमदाचार्यांवर अभिचाराचा प्रयोग केला, त्यायोगानें आचार्यांना भगंदर रोग उत्पन्न झाला. तेव्हां 'संभूतकवच' संज्ञक गणे-

शवर्मीच्या योगानें श्रीमदाचार्यांनी त्यापासून आपली मुक्तता करून घेतली. एके दिवशी श्रीमदाचार्यांनी श्रीविश्वनाथाची पूजा करून स्तवन केलें असतां श्रीविश्वनाथांनीं प्रत्यक्ष दर्शन दिलें. व मोठ्या प्रेमानें आलिंगन देऊन त्यांना श्रीकाशीशानें पांच स्फटिकाचीं चंद्रशेखरयुक्त शिवलिंगें दिलीं. आणि ते श्रीमदाचार्यांना म्हणाले ' वत्सा, शंकरा, तूं तर माझाच अंश आहेस. प्रत्येक शिष्यानें ज्ञानसिध्यर्थ श्रीगुरूचें पूजन करावें असा शास्त्रीय नियम आहे.तस्मात् तुझ्या प्रमुख शिष्यांनीं यथाविधि गणेशाराधन केल्यानंतर या लिंगांचें ठिकाणीं तुझें पूजन करावें. म्हणजे त्यांना ज्ञान व योग यांची सहज प्राप्ती होईल. असें बोलून श्रीकाशीश्वर विश्वेश-लिंगांत अंतर्हित झाले. श्रीमदाचार्यांनीं शंकराज्ञेप्रमाणें चंद्रमौलीश्वर लिंगाचें व गाणेशाद्वैतादि-संप्रदायांचें दान करून सुरेन्द्रप्रमुखशिष्यांना भिन्नभिन्न स्थळीं स्थापन केलें. श्रीमदाचार्य-चरित्रांतील जे जे वादप्रसंग अथवा ज्या ज्या गोष्टी लोकप्रसिद्ध आहेत त्या अर्थातच आरंभीं सांगितल्याप्रमाणें स्थलाभावास्तव येथें पुन: उद्धृत केलेल्या नाहींत. म्हणून त्यांच्या याथार्थ्याबद्दल शंका घेण्याचें प्रयोजन नाहीं.

वर बदरिकारण्यांत श्रीगौडपादयोगीन्द्र-अनुग्रहाचा व पंचलिंग-प्राप्तीचा जो प्रसंग आलेला आहे त्याचें प्रत्यंतर मागें आम्हीं उल्लेखिलेल्या 'सदाशिव-ब्रह्मेन्द्रकृत 'श्रीजगद्गुरुरत्नमाला' प्रकरणांतही दिसतें.त्या प्रसंगाचे श्लोक असे:

'प्रविशन् बदरीमवाप्यसद्यः परमाचार्य-पदार्चनं क्रमाद्यः ।
धवलाचलमाप्ययोऽप्यमाद्यच्छिवलावण्यमुदीक्ष्य तं प्रपद्ये ॥ २३ ॥
प्रतिपादितलिंगपंचकेऽमुं प्रणिवर्त्याशुतिरोहिते गिरीशे ।
विनिवृत्य स दिग्जयप्रवृत्तो विविधैः शिष्यवरैर्विभातु चित्ते ॥ २४ ॥

यापैकीं प्रथम श्लोकांत 'श्रीमदाचार्य बदरिकाश्रमांत गेल्यानंतर त्यांना श्रीगौडपादयोगीन्द्रांचें दर्शन होऊन ते साक्षात् शिवरूप असल्याचें पाहून आचार्यांना मोठा आनंद झाला, असें सांगितलें असून दुसऱ्या श्लोकांत 'श्रीशंकराकडून योग, भोग, वर, सिद्धि आणि विमुक्ति या पांच स्फटिक लिंगांची प्राप्ती झाल्यानंतर सुरेश्वरप्रमुख शिष्यांसह ते दिग्जयाकरितां निघाले असें वर्णिलें आहे.

श्रीमदाचार्य 'षण्मत-संस्थापक' म्हणून प्रसिद्ध आहेत. त्या विषयीं चार शब्द लिहून हा श्रीभगवत्पादयोगीन्द्र चरित्रात्मक लेख-विभाग संपवूं.

## शैवाद्वैतस्थापन.

श्रीमदाचार्य दिग्जययात्राक्रमानें 'पुंडरीकपुरास' जाऊन तेथील नृत्यमान शंकराचें दर्शन घेतल्यानंतर 'रामसेतूला' आले. यथाविधि समुद्रस्नान करून मोहासुरनाशक 'श्रीमहोदराचें' सेवन झाल्यानंतर तेथेंच श्रीमदाचार्य स्थित झाले. त्यांच्या शिष्यांनीं अद्वैत सिद्धान्ताचा घोष केला. तो ऐकून परमत-कालानल प्रमुख तान्त्रिक शैव-जे त्या ठिकाणीं निवास करून होते, ते श्री-मदाचार्यांसमीप येऊन आपलें मत सांगूं लागले. तेव्हां आचार्य म्हणाले, 'तुम्हीं ब्राह्मण-वर्णस्थ आहांत; ब्राह्मणादि तीन वर्णांना वेदांविषयीं अधिकार आहे. वेदाधिकारयुक्त लोकांना 'श्रुति' हेंच मुख्य प्रमाण असून तदनुकूल स्मृत्यादीहि प्रमाण आहेत. तुम्हीं जो हा तांत्रमार्ग स्वीकारिला आहे तो वेदांविषयीं ज्यांना अधिकार नाहीं त्यांच्या विषयींच आहे. अर्थात् त्या मार्गाचें आचरण तुम्हांला निंद्य आहे. वेदाच्या जितक्या शाखा आहेत तितकींच उपनिषदें आहेत. त्यांपैकीं एकतृतीयांश उपनिषद्भाग ज्ञानोपासन बोधक आहे. वेदाधिकारी पुरुषानें उपासनामार्गाचें आचरण करावयाचें तें वरील उपनिषन्मार्गाचा व तदुपबृंहक श्रौतकल्पमार्गाचा आश्रय करूनच केलें पाहिजे. तरच पुरुषार्थ-चतुष्टयपूर्वक कैवल्याची सिद्धि होणारी आहे. वैदिक शैवमार्गाचें स्वरूप 'नीलकण्ठ' प्रमुख उपनिषदांत व 'दाधीचादि' कल्पशास्त्रांत विशेषप्रकारें सांगितलें आहे. त्याचेंच आम्हीं किंचित् दिग्दर्शन करीत आहों '

'पूर्वीं महाशैवशिरोमणी श्रीनंदिकेशानें मोठ्या भक्तिभावानें शंकराचें आराधन केलें. ते प्रसन्न झाल्यावर त्यांच्या आज्ञेनें नंदीनें त्यांच्या स्वरूप-ज्ञानाविषयीं प्रश्न केला. तेव्हां शिव म्हणाले 'मी सच्चिदानंदरूपी परमात्मा असून अव्याकृतमायेनें प्रकृति-पुरुष-भेदात्मक 'अर्धनारीश्वर' स्वरूप धारण केलें आहे. हें माझें व्यावहारिक स्वरूप असून परमार्थस्वरूप मायाचिद्योगरूप-सगुण-निर्गुणाभेद गजवक्त्ररूप हें होय. अशा माझ्या ज्ञानानें जे माझी उपासना करितात त्यांनाच माझी सायुज्यता प्राप्त होत असते. माझ्या ईक्षणानें ज्या वेळीं माझ्या मायेपासून सत्वरजादि त्रिगुण पृथक् झाले, म्हणजे ब्रह्मवि-ष्णुरुद्रादि जगव्द्यवहारकर्ते व क्रमानें इतरही सृष्टी उत्पन्न झाली, तेव्हां त्यांनीं माझें स्मरण करून जगद्व्यवहारकार्यास आरंभ केला. परंतु त्यांना मोठीं विघ्नें येऊं लागलीं, तेव्हां ते सर्व मला पुनः शरण आले, त्यांच्या विघ्ननाशाकरितां

मी आत्मध्याननिष्ठ होऊन प्रकृति–पुरुषातीत अशा माझ्या आत्मस्वरूपाचें निरीक्षण केलें. त्या बरोबर मदात्मा परंब्रह्मच व्यक्तरूपानें–परब्रह्मद्योतक गजवक्त्रादि चिह्नानें प्रगट झालें. तोच गणेश म्हणून प्रसिद्ध होऊन माझा पुत्र म्हणून माझ्या कांहीं भक्तांनीं त्याला मानिलें. कित्येकांनीं शिवानें विघ्न-नाशाकरितां याला उत्पन्न करून स्थापन केलें असेंही म्हटलें, कित्येकांनीं 'शिव हे परमार्थ स्वरूप असून त्यानेंच जगव्द्यवहाराकरितां हें गजवक्त्ररूप धारण केलें अशी कल्पना केली' कित्येक माझा अनुग्रह पावलेले माझे सद्भक्त 'शिव तुरीयमूर्ति असून माझा आत्मा 'गणेश' हा स्वतंत्र, पंचम, ब्रह्मरूप, ब्रह्मणस्पती, कैवल्यसिद्धिदाता आहे' असें मानून दृढभावानें भजन करिते झाले.'

श्रीमदाचार्य म्हणतात 'द्विजहो, असल्या शैवज्ञानाशिवाय शैवसायुज्य मिळण्याचा संभव नाहीं. व हीं शैवज्ञान–स्फूर्ती वैदिकमार्गानुष्ठानाशिवाय कदापि होणें शक्य नाहीं. वरील प्रकारें शैवज्ञान श्रवण केल्यानंतर नंदि-केशानें त्याचा उपाय विचारिला असतां श्रीशंकरांनीं प्रथम आपल्या मंत्राचें स्वरूप कथन करून आपल्या वैदिकउपासनामार्गाचें स्वरूप सांगितलें.' शिव म्हणाले, 'माझें आराधन 'शुद्ध,' 'प्रासाद' व 'पंचार्चन' असें तीन प्रकारचें आहे. यांपैकीं 'शुद्ध' उपासन काम्य असून त्याचा अंतर्भाव 'तंत्रांत असल्यामुळें तें वैदिकांना अग्राह्य आहे. माझ्याविषयीं ज्यांच्या मनांत अतिशय प्रेम वसत असतें ते प्रासाद मार्गाचे अधिकारी होत. ज्यांची मोक्षमार्गा-विषयीं अतिशय प्रीति आहे व तत्प्रापक ज्ञानसिद्धीकरितां जे पूर्वसंस्कारामुळें माझी उपासना करूं इच्छितात ते 'पंचार्चना'विषयीं अधिकारी आहेत. माझें पंचार्चन म्हणजे माझ्या उपासनाप्राधान्यानें इतर चारही देवांचें उपा-सन करणें हें होय. गणेशासह माझें आराधन तें प्रासाद म्हणजे प्रत्येक उपासना-कर्म प्रथम गणेशाचें करून नंतर माझें करणें. (या व इतर मार्गांचें सामान्यतः स्वरूप 'अंकुशांत' क्रमानें स्वतन्त्रच येणार आहे.) अशा माझ्या वैदिकाराधनानें जो पुरुष माझ्या ज्ञान–स्वरूपाचें चिंतन करितो तोच पूर्ण मुक्तीला प्राप्त होत असतो.' असें सांगून श्रीशिव अंतर्धान पावले. तस्मात् तुम्हीही हें अवैदि-कमार्गाचरण सोडून वैदिक मार्गाचा स्वीकार करा.' असें बोधून श्रीमदाचा-र्यांनीं त्यांना आपल्या शिष्याकरवीं यथोक्त प्रायश्चित्त देऊन वैदिकमार्गी केलें.

## शाक्ताद्वैतस्थापन

नंतर तेथून क्रमानें आचार्य 'पुण्यपुरा'स आले. तेथें असलेले त्रिपुरा-शक्तिपुत्रादि तान्त्रिक शाक्त आचार्यांकडे येऊन आपला सिद्धान्त सांगूं लागले. तेव्हां आचार्य म्हणाले 'तुमचें हें मत सिद्धान्तांत मुळींच ग्राह्य नाहीं. द्विजांना वेदच मुख्य प्रमाण असून वैदिकांना 'तंत्र' सर्वथा अग्राह्य आहे. तुम्हीं वैदिक-मार्ग सोडून तान्त्रमार्गाचा आश्रय केला आहे हें अत्यंत निंद्य आहे. तुम्हीं वेदनिंदक आहांत. वेदोक्त-उपासनेनें तुम्हांला इष्ट-सिद्धी मिळणारी नाहीं, असली तुमची वेदाविषयीं निकृष्ट बुद्धि आहे. 'भुवनेशी' प्रमुख उपनिषदांतून जें अद्वैत-शाक्त-मार्गाचें प्रतिपादन केलें आहे तें लक्षांत घेऊन वैदिक-शाक्त-मार्गी व्हा, तरच तुम्हांला सिद्धी मिळेल. अन्यथा कोटिजन्म जरि आराधन केलें तरी सिद्धी तर नाहींच, पण उलट अधोगतीच ठरलेली. हें तुमचें शक्तिपादादि चिन्हाचें अंकन म्हणजे अवैदिक मार्गांचा ध्वजच आहे. व तो तुम्हांला सुखरूपपणें वैदिकेतर-वाममार्गाकडे म्हणजे अधोगतीकडेच निश्चयानें नेणारा आहे! वैदिकशाक्तमार्गाचें तत्व व उपासनामार्गाचें दिग्दर्शन आम्हीं संक्षेपतः करीत आहों हें लक्षांत घ्या. पूर्वी 'हयग्रीव' नामक महाशाक्तानें शाक्त-ज्ञानासिध्यर्थ श्रीशक्तीचें आराधन केलें असतां देवीनें प्रसन्न होऊन शाक्त-सिद्धान्त-बोधक भाषण केलें. 'ब्रह्म, ब्रह्म म्हणून वेदामध्यें जें उद्घोषित आहे तें भूमास्वरूप आहे. त्याचेंच वर्णन 'अध्यारोपापवादन्यायानें' सच्चिदानंदरूपानें भिन्न भिन्न ठिकाणीं केलें आहे.' अहंब्रह्मास्मि' ही जी स्वसंवेद्यात्मक स्फूर्ती होते तेंच माझें मूळ-स्वरूप होय. माझ्या पासूनच विद्या-अविद्या-तामस्यादि माया निर्माण झाल्या असून मी सर्वांचें मूळ असल्यामुळें मला 'आदिमाया' असें म्हणतात. सर्वस्वसंवेद्यरूपिणी स्वस्वरूपात्मिका जी स्वानंदमाया तिच्या अभेदत्वानें माझ्या अंतिमस्वरूपाचें वर्णन वेदांनीं केलेलें असल्यामुळें मला 'असत्स्वानंदरूपिणी' ही ह्मणतात. माझ्या यथार्थ स्वरूपाचें ज्ञान करून घेऊन वैदिक दीक्षामार्गानें जे माझें आराधन करितात ते या माझ्या 'असत् स्वानंद' रूपांत लीन होतात. अविद्या-पादामध्यें माझें अव्यक्त-स्वरूप जें अविद्या प्रपंचाला आधारभूत होऊन व्यक्तत्वाला प्राप्त होतें, त्याला 'पराशक्ती' अशी संज्ञा येते. क्रिया-शक्तिरूपानें माझें ऐश्वर्य पृथक्पणें प्रतीत होत असल्यामुळेंच मला 'शक्ति' असें म्हटलें

असून माझ्या मोहनादि ऐश्वर्याला अनुसरून माझ्या रूपाचें वर्णन वेदांनीं केलें आहे. त्याकृत ब्रह्मांडाला 'भुवन' अशी संज्ञा असून त्याची अधिष्ठात्री देवता मी असल्यामुळें मला 'भुवनेश्वरी' असें म्हणतात. मी एकदा सर्व चराचर निर्माण करून आत्मध्याननिष्ठ झाल्ये असतां माझ्या ध्यानापासून एक पुरुष उत्पन्न झाला. त्याच्या सांगण्यावरून तो मदात्माच भिन्नरूपानें माझ्या सृष्टीचा व्यवहार निर्विघ्नपणें होण्याकरितां उत्पन्न झाला आहे असें जाणून मी त्याला माझा पुत्र असें म्हटलें. त्याच्यासह माझ्या आराधनानें सर्वसिद्धि होईल असें सांगून मदंशापासून उत्पन्न झालेल्या ब्रह्मविष्ण्वादिकांना सृष्ट्यादि कार्यांत प्रवृत्त केलें. सर्व-विश्वांतील शक्तिरूप हें मदंशभूतच आहे. एवंच, मीच सर्वजगास कारण आहे. 'दीक्षित' व 'अदीक्षित' भेदानें माझें वैदिक आराधन दोन प्रकारचें आहे. त्यांतही पुनः 'प्रासाद' व 'पंचार्चन' असे दोन भेद आहेत. माझें 'शुद्ध' आराधन म्हणजे केवळ माझ्याच मूर्तींचें आराधन वैदिक होत नसून तें तान्त्र आहे व केवळ काम्य फल देणारें आहे. गणेश हा सर्वात्मा सर्वपूज्य असल्याचें वेदांनीं वर्णिलें असल्यामुळें त्याच्या आराधनासह माझें आराधन हें 'प्रासाद-संज्ञक' असून शक्तिप्रमुख पांच देवांचें उपासन म्हणजे 'पंचार्चन' होय. पंचार्चनानें ब्रह्मज्ञान—सिद्धिक्रमानें—कैवल्यप्राप्ती होणारी असून माझें प्रासाद आराधन मला प्रिय असल्यामुळें त्यायोगें माझ्या स्वरूपाची प्राप्ती लौकर होत असते. व दुसरें ज्ञानभूमिक्रमानें मत्स्वरूपज्ञानाला क्रमानें कारण होतें. माझ्या भक्तांतही दोन प्रकारचे उपासक असतात. एक माझ्या त्रिगुणात्मक स्वरूपाचें चिंतन करीत असतात. व दुसरे माझ्या त्रिगुणातीत तुरीयरूपाचें ध्यान करितात. कोणत्याही प्रकारानें माझ्या स्वरूपाचें ज्ञान करून घेऊन वैदिक मार्गानें जे माझें आराधन करितात ते अधिकारानुरूप उपासनाबलानें पूर्णसिद्धीला पावतात.' श्रीमदाचार्य म्हणाले 'भगवती आदिशक्तीनें सांगितलेल्या या वैदिक मार्गाचेंच तुम्हीं अवलंबन करा.' असें भाषण ऐकून शाक्तमंडळींनीं कृताचाराबद्दल प्रायश्चित्त घेऊन शुद्ध मार्गाचा अवलंब केला.

### वैष्णवाद्वैतस्थापन

श्रीमदाचार्य आपल्या शिष्य-मंडळीसह 'मथुरापुरी'ला प्राप्त झाले असतां तेथील वैष्णव-अर्थात् कालप्रभावानें वैदिकमार्ग लुप्तच झालेला असल्यामुळें

तान्त्रिक असलेले—लोक आचार्य—दर्शनास आले व आपल्या मताचा बडिवार सांगू लागले. तेव्हां आचार्यांनीं पूर्वींच्या लोकांप्रमाणें वैदिकमार्गाचें महत्व व तान्त्रमार्गाचें निन्द्यत्व त्यांना पटवून देऊन व ते दुराग्रही नसल्यामुळें शुद्ध मार्ग—ज्ञानाविषयीं अधिकारी आहेत असें जाणून त्यांना वैदिक वैष्णव—सिद्धान्ताचा उपदेश केला. ( पार्थसारथीप्रमुख वैष्णवसिद्धान्तबोधक उपनिषदादि ग्रंथांतून जें वर्णन विस्तारानें आलें आहे, व ज्याचा संग्रह म्हणून श्रीमदाचार्यांनीं—श्रीकृष्ण व पार्थसंवादरूप—असा वैष्णवांना कथन केला आहे त्याचेंच तात्पर्य जरा विशद करून येथें दिलें आहे. त्यावरून इतर मार्गाविषयींहि विशेष कल्पना येईल. ) विष्णूच्या अंशापासून उत्पन्न झालेल्या महारथी पार्थानें एकदा प्रश्न केला 'भगवन् आपलें स्वरूप पूर्णपणें मला कथन करावें' श्रीकृष्ण म्हणाले 'वेदप्रतिपाद्य ब्रह्म सच्चिदानंदरूप व स्वसंवेद्य असून निर्गुण व निरालंब आहे. शिंपेच्या ठिकाणीं होणाऱ्या रुप्याच्या भ्रांतीप्रमाणें त्या ब्रह्मस्वरूपापासून माया उत्पन्न झाली आहे. तिला प्रकृति अशी संज्ञा असून मठाकाशवत् तिच्या ठिकाणीं बिंबित असलेल्या परब्रह्माला पुरुष अशी संज्ञा आहे. हा पुरुष सर्वेश्वर सर्वकारण असून गुणसमस्तांशरूप आहे. त्या उभयतांपासून जें सत्वांशविशिष्ट प्रकृति पुरुषाभेद रूप तें जेव्हां भिन्नत्वाला प्राप्त होतें, तेव्हां त्याला आदिनारायण असें म्हणतात. याप्रमाणेंच तमोविशिष्टाला शिव, रजस्तमोविशिष्टाला शक्ती आणि तमःसत्वविशिष्टाला सूर्य अशा संज्ञा असून गुणसमस्तांश रूपाला गुणेश अशी संज्ञा आहे. तात्पर्य एका गुणेशाचेंच वर्णन महानारायणादि रूपांनीं केलेलें असून तोच परमात्मा गुणेश कार्यविशेषानुरूप विशिष्टांशानें भिन्नरूप धारण करितो. अर्थात् तोच सर्व उपासकांना शेवटीं गम्य असल्यामुळें साक्षाद्ब्रह्मप्राप्तीचें द्वार आहे. अस्तु.

भगवान् श्रीगुणेशाचें जें सत्वगुण विशिष्टरूप तेंच माझें आदिनारायण वा महानारायण स्वरूप होय.नंतर व्याकृताव्याकृत अशा जगत्सृष्टिकरितां मीच अर्धनारीश्वर रूप धारण केलें. तेंच गोलोकवासी ' राधाकृष्ण ' संज्ञक निर्गुण महिमा बोधक रूप होय.त्यायोगें मला भूतिनारायण असें अभिधान प्राप्त झालें व माझ्या दोन्ही स्वरूपाचें मूल जें स्वमहिम्निस्थ सत्यं—ज्योतिः—स्वरूप दृष्ट झालें तें सगुण—निर्गुणाभेद असें नरकुंजराकृती आत्मस्वरूप होय.

'आदिनारायण' हें माझें निर्गुण स्वरूप असून, 'भूतिनारायण' हें माझें सगुणस्वरूप आहे. आणि दोहोंना मूळ व दोहोंच्या अभेदीं तिसरें माझें सत्यंज्योतिःस्वरूप होय. या प्रमाणें हे पार्था, माझ्या मुख्य तीन मूर्ति वेदांनीं वर्णिल्या आहेत. माझ्या सत्यंज्योतिःस्वरूप मुख्य मूर्तीच्या वीक्षणानें मा या सगुणमूर्तीपासून पुनः प्रकृति आणि पुरुष असा मी द्विविध झालों. तेव्हां माझ्या पुरुषरूपाला 'कृष्ण' अशी संज्ञा झाली असून माझ्या प्राणशक्तिरूप स्त्रीरूपाला राधिका अशी संज्ञा आहे. हें माझें जगदुपादानकारण आविद्यक रूप होय. या माझ्या अव्याकृत रूपापासून ब्रह्मविष्ण्वादि-व्याकृत त्रिगुणांच्या अधिदेवांची-उत्पत्ती झाली. व माझ्या शक्तीपासून त्यांच्या शक्तींचीही उत्पत्ती झाली. नंतर ते ब्रह्माण्डांत प्रविष्ट होऊन विश्वव्यवहार करूं लागले. अनंतकोटि ब्रह्माण्डांतील सत्वगुणी विष्णूंची समष्टी हें माझें कृष्णस्वरूप होय. अस्तु. याप्रमाणें ब्रह्मांडांमध्यें माझ्या आज्ञेनें विष्ण्वादिकांचा विहार सुरू झाला. परंतु माझ्या आत्मस्वरूपाचें विस्मरण झाल्यामुळें त्यांना मोठें विघ्न होऊन जगद्व्यवहार बंद पडला. तेव्हां ते मला शरण आले. त्यांच्या विघ्नांच्या कारणांचा विचार करून मी त्यांना म्हणालों 'माझें सगुणनिर्गुणाभेद असें एक गजवक्त्र स्वरूप आहे. तें ब्रह्मरूप आहे. ब्रह्मरूपाचें कार्य जो सर्वेश्वर पुरुष-गुणेश तो सत् आणि असत् स्वरूप आहे, त्याचा जो असत् भाग त्यालाच काल अथवा विघ्न अशी संज्ञा आहे. सर्वहि कार्य अथवा कारणरूप भिन्नत्वानें विहार करीत असलेले मदादिदेव गुणेशाच्या सद्भागान्तर्गतच असल्यामुळें त्यांना सर्वसमष्टिरूप [अधिकशक्ति] असलेल्या असद्रूप विघ्नाचें आक्रमण करितां येत नाहीं. सदसदभेदरूप ब्रह्मचिह्नाला अर्थात् गजवक्त्रस्वरूपाला पाहून मात्र विघ्न पुरूष हतवीर्य होतो. म्हणूनच वेदांनीं या सर्वात्म स्वरूपाचें आदिपूज्यत्व व सर्वपूज्यत्व वर्णिलें आहे. यालाच विघ्नेश असें म्हटलें आहे. अर्थात् या विघ्नेश पूजेरहित जी माझी पूजा अथवा आराधन तें सर्व निष्फल आहे. इतकेंच नव्हे तर या योगानें अधोगतिरूप विघ्नानें तो पूजक पुरा पुरा पीडित होतो. म्हणून श्रुति स्मृत्यादिग्रंथांत विहित शुभाशुभ कर्मारंभीं व लौकिक कर्मारंभींहि सर्वसिद्धीकरितां या विघ्नेशाचें पूजन केलें पाहिजे असें निग्रहानें सांगितलें आहे. तेव्हां तुम्हीहि असेंच करा म्हणजे निर्विघ्न व्हाल. विष्ण्वादिकही त्याप्रमाणें करून निर्विघ्न झाले असें हें माझें तत्वस्वरूप असून याच्या प्राप्तीकरितां म्हणजे तें बुद्धीवर रूढ म्हणजे प्रकाशित होण्याकरितां व त्याच्या अनुभवाकरितां माझ्या वैदिकाराधनानें

माझी कृपा संपादन केली पाहिजे. माझ्या कृपेवांचून मल विक्षेपादि दोष नष्ट होणार नाहींत व मलविक्षेपादि दोष तसेच राहून बुद्धी निर्मल व निश्चल न झाल्यानें माझ्या स्वरूपाचा प्रकाश होणें कदापि शक्य नाहीं.'

श्रीमदाचार्य म्हणतात 'असें श्रीकृष्णाचें तत्वस्वरूप श्रवण करून वैदिक आराधनाविषयीं पार्थानें प्रश्न केला असतां त्याला श्रीकृष्ण म्हणाले ' वर ज्या माझ्या तीन मूर्ति वर्णिल्या आहेत, त्यांच्या ज्ञानाचें स्फुरण होण्याकरितां वेदांनीं अनेक मन्त्र सांगितले आहेत. त्यांपैकीं एखादा मन्त्र यथाविधि ग्रहण करून माझें आराधन करावें. कोणत्याहि मूर्तीचा कोणताहि एखादा मन्त्र ग्रहण केला तरी त्याच्या पूर्ण सिद्धीकरितां माझ्या मूल स्वरूपाचा म्हणजे विघ्नेशाचा मंत्र ग्रहण केलाच पाहिजे. या शिवाय इतर माझ्या मूर्तींचे जे अनेक मंत्र आहेत, ते ज्ञानसिद्धीला साधक असे आहेत. मंत्रजप आणि अर्चन हीं उपासनेचीं दोन अंगें आहेत. माझें अर्चन बाह्य आणि अंतर्भेदानें दोन प्रकारचें आहे. अंतरुपासन हें षट्चक्रध्यान-साधनात्मक आहे. त्याला भूतियोग अशी संज्ञा आहे. तें आराधन माझें पञ्चार्चन करणारांना आवश्यक आहे. माझ्या एकनिष्ठभक्तांचा आराधनक्रम भिन्न आहे. तो अंतर्बाह्यात्मक असल्यामुळें त्याला अहंग्रहोपासन म्हणतात. माझ्या स्वरूप—प्राप्तीचीच केवळ ज्यांना इच्छा असते त्यांनाच मुख्यतः हा मार्ग उक्त आहे. यामुळें या मार्गानें आचरण करणारे लोक माझ्या कृपेनें लौकरच सिद्धीला पावतात. त्या उपासना मार्गाचें स्वरूप थोडक्यांत सांगतों; लक्षांत ठेव. शास्त्रीय मार्गानें माझ्या उपासनेंत प्रविष्ट झालेल्या सद्भक्त वैष्णवांनीं नित्य ब्राह्ममुहूर्तीं उठून यथाविधि शुची व्हावें. उषःकालजाप्यादिकांचें पठण व माझें ध्यान मानस पूजन झाल्यानंतर पंचांग मंत्रस्नान करावें. गुरुसंप्रदायाप्रमाणें तुलसीमूलमृत्तिका, गोपीचंदन, अथवा श्वेतमृत्तिका यांचा ऊर्ध्वपुण्ड्र तिलक विधियुक्त धारण करावा. साध्या अथवा तापलेल्या वगैरे मुद्रादिकांचें धारण वैदिकांना सर्वथा निंद्य असून वैदिक संस्कारांपासून भ्रष्ट करणारें आहे. अर्थात् त्यापासून वैदिकफलाची आशाच करणें नको. संध्यादि नित्य-नित्य कर्म आटोपल्यावर आचार्यांकडून दीक्षाविधीनें प्राप्त झालेला विघ्नेशमंत्र प्रथम जपून नंतर माझ्या मंत्राचा जप करावा. पुढें दुसरेहि आवश्यक जप आटो-

पून आश्रमधर्माला अनुसरून श्रौत अथवा स्मार्ताग्नीचें उपासन करावें. नंतर माझें अथर्वशीर्ष, कवच, हृदय, सहस्रनाम, स्तवराज, व गीता आणि विघ्नेशकवच व अष्टोत्तरशत-नामस्तोत्र यांचा जप करावा. नंतर संग्रहानें प्रथम श्रीगणेशपूजा करून द्वारपूजादि पूजांगांसह माझें सपरिवार सांगोपांग अर्चन करावें. पंचार्चनामध्यें प्रथम गणेशपूजा व नंतर माझी पूजा आणि नंतर इतरांची पूजा असा क्रम आहे. माझ्या पूजनास मुख्यतः गंडकीशिला, रत्नगर्भ किंवा शोणभद्रशिला असावी. विघ्नेशासह केवळ माझें आराधन हें प्रासादाराधन होय. या शिवाय गणेशाचें स्वतंत्र आराधन न करितां केवळ प्रत्यवाय निवृत्त्यर्थ गंधादिकांच्या ठिकाणीं स्वल्प पूजन करून जें माझें अर्चनादि करणें त्यालाहि क्वचित् शुद्धपूजन म्हटलें आहे. पण तें मुख्यतः काम्यफलदायक असून कैवल्यसिद्धीला वा माझ्या प्राप्तीला फारच मंद गतीनें साधक होणारें आहे. असो; येन केन प्रकारानें वैदिक मार्गानें माझें जो आराधन करितो त्यालाच उत्तमगती प्राप्त होते.

श्रीमदाचार्यांनीं पार्थ कृष्ण-संवादात्मक हा वैष्णव-सिद्धान्त सांगितलेला ऐकून त्या वैष्णवांना मोठा आनंद झाला. व त्यांनीं श्रीमदाचार्यांना शरण होऊन यथोक्त प्रायश्चित्तपूर्वक वैदिक वैष्णव—मार्गाचा अवलम्ब केला.

### सौराद्वैत स्थापन.

नंतर श्रीमदाचार्य ‘ गंडकी ’ नगरांत आले. तेथें सिंधुदानवमर्दक श्रीमयूरेशाचें पूजन करून ते त्या ठिकाणीं ध्याननिष्ठ होत्साते बसले आहेत तों तेथें आसपास रहाणारे तान्त्रिकसौर तेथें येऊन आपला सिद्धान्त सांगूं लागले.

तो ऐकून व ते ज्या मार्गाची एव्हढी प्रशंसा करितात तो मार्ग त्यांना सर्वथा निंद्य आहे असें जाणून श्रीमदाचार्य म्हणाले, ‘ द्विजश्रेष्ठहो, आर्यधर्मानुयायी मानवांमध्यें ब्राह्मण क्षत्रियादि वर्णत्रयोद्भूत तीन प्रकारचे मानव श्रेष्ठ होत. त्यांच्या उत्पत्तीमध्यें क्रम, अनुलोम, प्रतिलोम व संकर असे प्रकार आहेत. त्यांपैकी क्रमोत्पन्नद्विजातींना मात्र वेदाधिकार आहे. आणि इतरांना ‘ मिश्र,’ तान्त्र,’ इत्यादिक मार्ग आहेत. वेदाविषयीं ज्यांना अधिकार आहे त्यांना त्यांवाचून इतर मार्गाच्या अवलंबनाचा मोठा निषेध आहे. तुम्हीं

त्रिवर्ण द्विजातिपैकीं श्रेष्ठ ब्राह्मणवर्णाचे आहांत आणि तान्त्र-मार्गाचें आचरण करितां हें योग्य नव्हे. विद्या-सिद्धान्त-मार्गानें सौर-सिद्धान्ताला मुख्य प्रमाणभूत असलेल्या 'संन्ध्यो'पनिषदांतील वैदिक-सौर-सिद्धान्ताचा किंचित् निर्देश मी करीत आहे. तो लक्ष्यांत घेऊन तुह्मी वैदिक मार्गानें श्री सूर्याचें उपासन कराल तरच तुम्हांला खरी ब्रह्मतेजःसिद्धी प्राप्त होणारी आहे. सांप्रत या जगदधिकार-पदावर जो रूढ आहे व ज्याच्या योगानें दिवस-रात्रीचा बोध होतो तो हा नवग्रहान्तर्गत श्रीसूर्य कश्यपाचा पुत्र असून तो नवग्रहांचा ईश्वर आहे. गुणेशापासून उत्पन्न झालेल्या हिरण्य-पुरुषाची म्हणजे परसूर्याची तो एक विभूति आहे. कश्यपाच्या तपानें प्रसन्न होऊन तो कश्यपाचा पुत्र झाला व हिरण्यपुरुषाच्या कृपेनेंच जगताचा अधिकार चालवूं लागला. अर्थात् सौरांचा उपास्य तो नसून, परमात्मा हिरण्यपुरुष म्हणजे सौरलोकवासी भगवान् परसूर्य हाच सौरांचा उपास्य होय. एकदां सौर-शिरोमणी मुनिश्रेष्ठ श्रीयाज्ञवल्क्य योगबलानें सौर-लोकीं गेले असतां त्यांच्या प्रश्नावरून भगवान् श्रीसूर्यानें सौरसिद्धान्त कथन केला. तो असाः—'सज्ज्ञानादिरूपांनीं ज्या निर्गुण-ब्रह्माचें वर्णन वेदांनीं केलें आहे, तें सत्य व अमृत रूप ब्रह्म माझें निर्गुण स्वरूप आहे. मायेच्या आश्रयानें त्याला साक्षित्व प्राप्त झालें आहे. त्या साक्षीरूपाला पुरुष व मायेला प्रकृति अशी संज्ञा आहे. प्रकृतीपासून त्रिगुण उत्पन्न झाले व त्यामुळें साक्षित्वहि त्रिविध झालें. त्या त्रिगुणाहंकृतिसाक्षिरूपाला हिरण्य-पुरुष अशी संज्ञा आहे. या हिरण्यपुरुषसंज्ञक माझ्या रूपापासून त्रिमूर्ती-विष्ण्वादि-उत्पन्न झाल्या. कारण पृथक् होणाऱ्या त्रिगुणाहंकृतीला मीच कारण आहे. माझ्या मायेपासून त्रिमूर्तींच्या शक्तीही उत्पन्न झाल्या. सृष्टीच्या आरंभीं याप्रमाणें माझ्यापासून उत्पन्न झालेल्या सशक्तिकविष्ण्वादिकांना मी ब्रह्मांड-कृत्यावर नियुक्त केलें. परंतु त्यांना माझ्या आत्मस्वरूपाचें ज्ञान नसल्यामुळें नानाप्रकारचीं विघ्नें उत्पन्न होऊन तीं त्यांच्या कृत्यांत अडथळा करूं लागलीं. अर्थातच व्यवहार बंद पडल्यामुळें ते विष्णादिदेव मला शरण आले. नंतर मी साक्षिरूप अशा माझाहि साक्षी जो भगवान् अंतःस्फूर्तिप्रेरक, मदं-तर्यामी, त्याचें स्मरण केलें व त्या स्वरूपाचें पूजन करून कार्य करण्याविषयीं त्यांना

आज्ञा केली. त्या बरोबर मदंतःस्फूर्तिप्रेरक महात्मा भगवान्-एकदन्त, पाशांकुशादि आयुधांनीं युक्त चतुर्भुज, रक्तवस्त्रें, रक्तगंधानुलेपन, शूर्पकर्ण चंद्रचूड त्रिनेत्र इत्यादिकांना धारण करून रक्तवर्ण व मूषकारूढ असा गजवक्त्ररूपानें प्रगट झाला. त्याला पाहून देवांनीं नमस्कार करून त्याचें विघ्नराज नांवानें स्तवन केलें व निर्विघ्न-सिद्धीविषयीं प्रार्थना केली.

नंतर पुनः प्रार्थना केली कीं, भगवन् आपण परसूर्याचें आत्मस्वरूपी आहांत. त्याचेंच द्योतक हें गजवक्त्राचिन्ह धारण केलें आहे. तसेंच बाकीच्या स्वरूपचिन्हांनींहि ब्रह्मत्वबोधच होत आहे. ब्रह्म सर्वदा मंगल असल्यामुळें आपल्या या मंगलस्वरूपानें आमच्या विघ्नांचा नाश झाला. हिरण्यपुरुषसंज्ञ हें रूप आपल्याच विशिष्टअंशाचें द्योतक आहे हें आम्हांस आपल्या कृपेनेंच कळलें. ज्यावेळीं त्रिगुणाहंकृती-साक्षित्वबुद्धीचा त्याग करून श्रीसूर्य स्वस्थित होतो त्यावेळीं या रूपांत व त्याच्यांत मुळींच भेद नाहीं. अशा तऱ्हेचें आपलें स्वरूप विघ्ननाशांविषयीं परमसमर्थ आहे. म्हणून विघ्नराज नांवानें आम्हीं आपलें स्तवन केलें आहे. कोणतेंहि वैदिक अथवा लौकिक शुभाशुभ कर्म जे कोणी आरंभीं आपलें पूजन केल्यावांचून करितील तसल्या त्या मूढतर प्राण्यांना हे प्रभो, आपण नेहमीं विघ्नच करा. आणि जे नेहमीं आपलें पूजन करूनच कोणतेंहि कर्म करितील त्यांना मात्र सर्व सिद्धी द्या. याप्रमाणें प्रार्थना करून ते विष्णवादिदेव आपल्या कार्याला निघून गेले. व विघ्नराजहि अंतर्धान पावले. भगवान् हिरण्यपुरुष ( परसूर्य ) याज्ञवल्क्यांना सांगतात, ही विघ्नराज संज्ञक माझी आत्ममूर्ति होय. इच्यासह माझें आराधन केलें असतां पूर्णसिद्धी प्राप्त होईल.' असें बोलून श्री सूर्यांनीं आपला सर्व पूजाक्रम व मंत्रादिविधि याज्ञवल्क्यांना कथन केला. प्रासादादि तीनहि प्रकार यांहि मार्गांत असून ते त्या तारतम्यानेंच फल देणारे आहेत. सुगंधयुक्त रक्तचंदनाचा मंडलाकृति तिलक हें सौरांचें बाह्य चिन्ह होय. श्रीमदाचार्य म्हणाले,' अहो सौरमार्गी द्विजश्रेष्ठ हो तुम्हीं ! आजपर्यंतच्या या आपल्या मार्गाचा त्याग करा. हें तप्तमुद्रादिधारण सोडून द्या आणि शुद्ध-वैदिक मार्गाचें अवलम्बन करून श्री सूर्याचें आराधन करा.' तेव्हां सर्वांनीं 'तथास्तु' म्हणून तसें केलें.

## गाणेशाद्वैतस्थापनम्

नंतर भगवान् श्रीशंकराचार्य श्रीभगवत्पाद योगीन्द्रमहाराज हे सिद्धाश्रमाला प्राप्त झाले. त्या ठिकाणीं असलेले ढुंढिराज, गणकुमार गौरीसुत प्रभृती तान्त्रगाणपत आचार्यसमीप येऊन गाणपतांचा सिद्धान्त कथन करूं लागले. तेव्हां श्रीमदाचार्यांनीं, हें तन्त्र मार्गाचरण योग्य नसून वेदाधिकाऱ्यानें वैदिक मार्गानेंच आचारण केलें पाहिजे, वगैरे वगैरे सांगून अद्वैत ब्रह्मोपनिषद प्रमुख उपनिषदुक्त वैदिक गाणेशोपासना मार्ग त्यांना कथन केला. तो श्रवण करून त्या गाणपतांनींहि आपल्या तान्त्रमार्गाचा त्याग करून पूर्ण वैदिक मार्गाचा आश्रय केला. या प्रसंगीं सर्व वेदशास्त्र-प्रतिपादित श्रीगणेश स्वरूपाचा जो उपदेश श्रीमदाचार्यांनीं केला तो येणें प्रमाणें:—

## गाणेशाद्वैत सिद्धान्त

वेद व त्यांचे उपबृंहण करणारीं पुराण, इतिहास, मीमांसादि शास्त्रें यांमध्यें जगत्कारणत्वानें जें ब्रह्म प्रतिपादित आहे, तें चतुष्पाद असल्याचें सांगितलें आहे. ( पादोऽस्यविश्वाभूतानि० ) या श्रुतिवाक्याप्रमाणें त्यांपैकीं पहिला 'आविद्यक' संज्ञक ब्रह्मपाद संपूर्ण विश्वात्मक असून बाकीचे तीन पाद ब्रह्मरूप आहेत. हे तीन पाद व तद्गत ब्रह्मविहारस्थिती केवल ब्रह्म या संज्ञेनेंच ज्ञानकांडबोधक उपनिषदांत वर्णिल्या आहेत. वरील तीन पादांपैकीं ' विद्या ' आणि ' स्वानंद ' हे दोन पाद अध्यारोपात्मक असल्यामुळें योग्यांच्या समाधीमध्यें त्यांची लयोत्पत्ती श्रुत आहे. चौथा जो आत्मपाद वा ब्रह्मपाद तोच अविनाशी सत्यस्वरूप असून वरील ' विद्या ' व ' आनंद ' यांचा नाश झाला असतां अपवादत्व सहजच निरस्त झाल्यामुळें तो ब्रह्मपादच साक्षात् ब्रह्म-भूमा-स्वरूप असतो. त्यालाच ब्रह्मणस्पती अशी संज्ञा आहे व ती अध्यारोपापवादरूप नानाविध ब्रह्मकल्पनेमुळें केवळ कथनात्मक होय. हा जो विद्याऽविद्याऽनंदात्मक विहार ज्या मायेच्या योगानें होतो, ती माया स्वानंद-माया म्हणून विख्यात आहे. या स्वानंद-मायेच्या योगानेंच परब्रह्म परमात्मा स्वानन्देशत्वाला प्राप्त झाला आहे. तिच्यापासूनच निरुपाधि अशी निर्गुण व सोपाधि सगुण अशी द्विविध माया उत्पन्न झाली. यानांच अनुक्रमें विद्या व अविद्या अशी संज्ञा आहे. यांचे विहार अनुक्रमें विद्या व अविद्या पादात्मक असून स्वानंद पादात्मक विहार स्वानंदमायेचा आहे. या

तीनही मायेच्या ठिकाणी त्या तीनही माया शांत झाल्या असतां जें ब्रह्मरूप प्रतीत होतें तेंच गणेश स्वरूप होय. हें गणेशस्वरूप अर्थातच तीन प्रकारचें म्हणजे सगुण, निर्गुण व स्वानंद असें आहे. म्हणजे साक्षात भूमास्वरूप ब्रह्मणस्पती परमात्मा या त्रिविधरूपानें तीनही पादांत पूर्णपणें व्याप्त आहे. या सर्व विश्वाचें कारण ब्रह्मच असल्याचें शास्त्र प्रसिद्ध आहे.

हें जगत्कारणत्व साक्षात् निमित्त व उपादान असें तीन प्रकारचें आहे. पूर्णब्रह्मत्व एका गणेशाचेंच वेदप्रतिपादित असल्यामुळें सगुण, निर्गुण, व स्वानंद अशीं त्याचीं कारणत्रय–बोधक तीन रूपें आहेत. यांपैकीं उपादान कारण सगुण स्वरूप हें अविद्या शांतिरूप असून अविद्याप्रपंच हें त्याचें कार्य आहे. हा अविद्याप्रपंच स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण असा चार प्रकारचा असून तो समष्टी व व्यष्टी असा दोन प्रकारचा आहे. विश्व, तैजस, प्राज्ञ, व कूटस्थ अशा व्यष्टी संज्ञा असून विराट, हिरण्यगर्भ, ईश्वर, आणि अव्याकृत अशा समष्टी संज्ञा आहेत. व या दोहींना मूळ व दोहींचें आद्यन्तस्थान स्थूलादि प्रपंचरूप जागृत स्वाप्न, सौषुप्त, आणि अस्मिता असें ब्रह्मचतुष्टय सांगितलें आहे. या आविद्यक प्रपंचाचे साक्षात्प्रेरक, ब्रह्मचतुष्टयांचे अधिष्ठाते, अनुक्रमें जागृत ब्रह्माधिष्ठात्री क्रियामयी शक्ती, स्वाप्न ब्रह्माधिष्ठाता जीवरूप सूर्य, सौषुप्त ब्रह्माधिष्ठाता उभय नियामक विष्णु आणि अस्मिता ब्रह्माधिष्ठाता साक्षी शिव असे ब्रह्मरूप देवचतुष्टय असून या सर्वांची समष्टी म्हणजे अविद्या प्रपंचाचें लयोत्पत्तिस्थान भगवान् गुणेश असून तो जगदुपादान कारण सगुण गणेशाचें कार्यरूप होय. विष्ण्वादि देव गुणेशाचे कार्यरूप असल्यामुळें गुणेशाचेंही कारणत्व वेदांत सांगितलें आहे, तसेंच भगवान् गुणेशच आपल्या विशिष्ट उपाधीनें शिवादिरूपें धारण करून आविद्यक प्रपंचाचा प्रेरक होत असल्यामुळें म्हणजे शिवादि हे गुणेशाचेंच एकेक अवयव असल्यामुळें त्यांचेंही कारणत्व सिद्धच आहे. गुणरूप व्याकृत प्रपंच हेंच त्यांचें कार्य होय. मात्र गुणेश हा कारणेश्वर असून शिवादि देव हे कारण आहेत. ते कारणेश असल्याचें श्रुतीनें वर्णिलें नाहीं. गुणेशाभेदत्वानें आपापल्या सृष्टि कालांत त्यांना कार्येशत्व व कारणत्व प्राप्त होत असतें. भगवान् श्रीगणेश मात्र कोणाचेंही कार्य नसून सर्व कारणांचाही कारण आहे.

या अविद्याप्रपंचापासून तरून जाण्याकरितां म्हणजे विद्या–प्राप्तीकरितां या अविद्या प्रपंचाधिष्ठात्या गणेशासह शिवादिदेव–चतुष्टयांचा साक्षात्कारच कारण आहे. म्हणून यांचें अंतर्बाह्य उपासना मार्ग शास्त्रांत कथन केले आहेत. शिवादिदेव हे गणेशान्तर्गत असल्याचें वर सांगितलें आहे. अर्थात् त्यांची उपास्ति साक्षात् ब्रह्मप्राप्तीला कारण होणारी नसून ती गणेश साक्षात्काराला वा गुणेशात्मा जो सगुण गणेश त्याच्या साक्षात्काराला साधक आहे. अविद्या–प्रपंच हा विद्या आणि स्वानंद यांचेच अनुक्रमें बिंब व प्रतिबिंब असल्यामुळें तद्गत शिवादिकांची स्थिति, विद्या व स्वानंद या दोनही पादांत अंगत्वानें सांगितलेली आहे. गणेशाची स्थिती या तीनही पादांत संयोगरूप असल्यामुळें पूर्णत्वानें वर्णिली आहे. म्हणजे या शिवादि चतुष्टयगणांचा तो ईश–नियामक-प्रेरक व सत्तादायक असल्यामुळें साक्षात ब्रह्म म्हणून वेद प्रसिद्ध आहे. हे त्याच्या सिद्धि–बुद्धि–पतित्व, स्वतन्त्रत्व, विनायकत्व, ज्येष्ठराजत्व, व सर्वादि–सर्वपूज्यत्व इत्यादि ऐश्वर्यावरून सिद्धच आहे.

अविद्या, विद्या आणि स्वानंद हे तीन पाद अध्यारोपात्मक असून या तीन पादांतच शिवादिकांची अनुक्रमें सगुणत्वानें निर्गुणत्वानें आणि ब्रह्मत्वानें प्रसक्ति आहे. पूर्णशांती वा ब्रह्मसायुज्य–सिद्धी ही भूमा ब्रह्मसाक्षात्कारानेंच होणारी आहे. पादचतुष्टयांपैकीं ब्रह्मपादत्यागानें सर्वशांतींनाही मूळ असलेली शांती प्राप्त होते. ब्रह्मपादामध्यें शिवादिकांची प्रसक्तीच नसल्यामुळें तें पूर्णशांती देण्याविषयीं अधिकारी नाहींत. म्हणजे त्यांच्या उपासनेनें भूमा-ब्रह्म-सायुज्य-सिद्धी होणारी नाहीं.असा वेदांचा सिद्धान्त आहे किन्तु हे शिवादिदेव पंचमस्थितिगत गणेशोपास्तिसिद्धीला सोपानपरम्परेनें कारण होत असल्यामुळें व गणेशोपास्तीही ब्रह्मप्राप्तीला कारण होत असल्यामुळें साक्षात् ब्रह्मसिद्धीला तेही परम्परया कारण होतात. शिवादि देवांचें मुक्तिदातृत्व वा कैवल्यसिद्धिदातृत्व जें श्रुतींनीं वर्णिलें आहे, तें वरील प्रकारेंच सिद्ध आहे. तथापि त्यांतही श्रीगणेशाराधन निग्रहानें सांगितलें आहेच. त्याशिवाय शांतिसिद्धि मिळण्याचा संभव नाहीं.कारण पूर्ण योगरूप श्रीगणेशच स्वानंद मायेच्या योगानें ब्रह्मपादाधिष्ठाता असून सगुण–निर्गुण व स्वानंद हीं त्याचीं व्यावहारिक रूपें होत.अर्थात् भगवान् एक गणेशच सर्व–स्वतंत्र असून तोच शांतिदाता आहे.

स्वानंदपाद हा त्याचा लोक आहे;म्हणजे स्वमहिमा हेंच त्याचें निवासस्थान आहे. स्वानंदमायेच्या योगानेंच तो दृष्ट म्हणजे प्रतीत होत असल्यामुळें त्याला स्वानंदमाया-देहधारी असें म्हटलें आहे. तनिही पादांमध्यें जे शिवादि चतुष्टयांचे विहार सांगितले आहेत, ते तो आपल्या सत्तादान-वीर्यानेंच करीत असून तद्गत ब्रह्मरस-भोक्ता तोच परमात्मा असल्यामुळें हें चतुष्टय त्या परात्म्याचे चार भुज होत. विद्या आणि अविद्या या दोन पादांच्या सम्मेलनानें म्हणजे क्रिया-ज्ञानात्मक विहारानें जगद्व्यवहार होत असल्यामुळें त्या परमात्म्याचे विद्या व अविद्या हे दोन पाद आहेत.प्राणिमात्रांकडून शुभाशुभ ज्या क्रिया होत असतात त्यांना स्फूर्ति देणारा परमात्मा ज्या आपल्या वीर्यानें शुभाशुभ वर्जित अशा भोगांचा भोक्ता होतो, म्हणजे सर्वत्र साक्षी-रूपानें सर्वत्र व्याप्त असून व्याप्यांना मात्र कळत नाहीं; त्या परमात्म्याच्या गमनागमनरूप वीर्याला मूषक अशी संज्ञा असून तेंच त्याचें वाहन होय. तो परमात्माच संपूर्ण विश्व-ब्रह्म-सृष्टीचा आधार व उत्पत्ति-स्थिति-लय-स्थान असून स्वयं मात्र निराधार आणि अनाद्यनंत आहे,ह्मणून त्यानें आपल्या या ऐश्वर्याचें द्योतक असें महोदर धारण केलें आहे. आपल्या स्वरूपाचें ज्ञान करून घेऊन जे कोणी सद्भक्त आपलें आराधन करितील त्यांनीं चिंतिलेल्या कार्याचें फल तात्काळ देणारा अथवा बुद्धिपतित्वानें प्राणिमात्रांच्या चित्तांत प्रकाश करणारा त्याचें द्योतक म्हणून त्यानें चिंतामणि धारण केलेला आहे.सर्वविश्व-ब्रह्म-नियंत्रणाची शक्ति त्या एकाच परमात्म्याची असल्यामुळें तिचें द्योतक अंकुश, मायेनें सर्वांना बद्ध करणारा व तिजपासून मुक्तही करणारा मायानियामक त्याचे द्योतक पाश, सर्वांना सर्व वर देणारा व वर देणाऱ्यांनाही वर देण्याचें सामर्थ्य देणारा-याचें द्योतक वरद, आणि योग्यांना अविद्येपासुन तों संप्रज्ञाताऽसंप्रज्ञात-समाध्यन्तच्या बंधनभयापासून आपल्या कृपावीक्षणानें तात्काळ मुक्त करणारा-याचें द्योतक अभय, अशीं चार आयुधें त्या परमात्म्यानें आपल्या हातांत धारण केलीं आहेत.सर्व नामरूपांना मूळ असलेलें प्रणव, प्रणवार्थ व तदभेद यांचें द्योतक जें ब्रह्मचिह्न, परमात्म्यानें धारण केलें आहे म्हणजे ज्या निर्गुणमूलक चिह्नानेंच त्याच्या स्वरूपाचें ज्ञान होतें,तेंच त्याचें मुख-गजवक्त्र होय.ब्रह्म हें अखंड व अमृत आहे याचें द्योतक क्षय-वृद्धि-हीन पूर्ण चंद्र परमात्म्यानें धारण केला आहे.त्याला शूर्पकर्ण अशी संज्ञा आहे.कारण संपूर्ण अज्ञान मळाचा नाश करून ज्ञानप्रकाशाविषयीं तोच एक समर्थ आहे,

स्वानंदमाया वर्णब्रह्मरूपिणी असल्यामुळें व वर्णांचा अभेद शुद्ध रक्त-वर्णांत होत असल्यामुळें, शुद्धरक्त म्हणजे सिंदुरवर्ण त्याचा देह आहे. माया ही वासना रूप आहे. ती सत् वा असत् रूपिणी असल्यामुळें सुगंध व दुर्गंध अशा दोन रूपांनीं सर्वत्र व्याप्त आहे. परंतु ब्रह्मसान्निध्यांत सुगंध व दुर्गंधाचा नाश होऊन ती ब्रह्मगंधा म्हणजे ब्रह्मवासनायुक्त होत्साती अभेदत्वानें रहात असल्यामुळें, परमात्म्याला दिव्य गंधानुलिप्त असें म्हटलें आहे. तो अध्यारोपापवादशून्य–सर्वाधिष्ठानरूप परमात्मा स्वानन्देश संयोग–मायारूप–बुद्धिगुहेमध्यें सत्–चित व आनंदरूपानें विहार करीत असलेल्या आपल्या रूपत्रयांचा म्हणजे तत्कृत विद्याऽविद्याऽनंद विहारांचा साक्षी असल्यामुळें त्याला त्रिनेत्र अशी संज्ञा आहे.

एवं रूप–वैभवयुक्त श्रीस्वानंदेशाचें वरील शब्दार्थसत्तेला अनुसरून व ती शब्दार्थ सत्ता ज्या रूपादिकांनीं सर्वदा प्रतीत होईल त्याचाच अव-लंब करून यथाशास्त्र आराधन करणें हेंच ब्रह्मसायुज्यसिद्धीला खरें खरें कारण होणारें आहे, असा गाणेशाद्वैती गाणपतांचा ठाम सिद्धान्त वेद सिद्धान्तानुरूप आहे. गणेशाचे वा शिवविष्ण्वादिकांचें जें आराधन शास्त्रांत सांगितलें आहे, तें अंतरंग व बहिरंग म्हणजे ज्ञान–प्रधान व कर्म-प्रधान असें दोन प्रकारचें आहे. ह्या दोहींचाही अवलंब करून केलें जाणारें जें उपासन तें अहंग्रहोपासन होय, व अशा तऱ्हेचे उपासक म्हणजेच तत्त्वदद्वैती होत. कर्म–प्राधान्यानें करावयाचें उपासन हें चित्तशुद्धिकारक असून ज्ञानांगोपासन निदिध्यासाला साधक होतें. उभयांचा आश्रय करून केलें जाणारें उपासन हेंच ब्रह्म-साक्षात्कार-सिद्धीला साक्षात व शीघ्रफलक आहे. म्हणून याचें महत्व म्हणजे अद्वैतसिद्धान्ताचें महत्व विशेष आहे.वर ज्याप्रमाणें भूमा ब्रह्मसाक्षात्का-राला साक्षात साधक अशी श्रीस्वानन्देशाची रूपादि कल्पना श्रुतिमाउलीनें केली आहे,तशीच ती शिवादिदेवांचीही तत्तन्महिमाबोधक कल्पना त्यांच्या सिद्धान्त ग्रंथांत केली आहे. अर्थात ही कल्पना अन्यत्र निराळ्या तऱ्हेनें कोठेंही कोणालाही करितां येणार नाहीं. इतकेंच काय, पण अशी–श्रीस्वानंदेशासा-रखी–सार्वभौम कल्पना शिवादिरूपांच्या ठिकाणींहि करितां येणारी नसून ती तशी फल देणारीही होणार नाहीं कारण तसें वेदप्रामाण्य नाहीं. तस्मात् ' ही कल्पना बसविलेली आहे व कोठेंही ती बसेल ही सम-

जून वा शंका व्यर्थ आहे. ब्रह्मसायुज्यसिद्धी ब्रह्म-साक्षात्काराशिवाय नाहीं. ब्रह्मज्ञानावांचून ब्रह्मसाक्षात्कारसिद्धी नाहीं, ब्रह्मध्यानसिद्धीवांचून ब्रह्मज्ञानसिद्धी नाहीं; आणि ब्रह्म हें निरालंब व निर्गुण असल्यामुळें ध्यानविषय होणें शक्य नाहीं. एतद्ध्याकरितां वरील शब्दार्थसत्तेनें ब्रह्मैश्वर्ययुक्त असलेल्या शिवादिकांची सोपानपरंपरेनें अधिकारसिद्ध्यर्थ- व साक्षाद्भूमा ब्रह्मैश्वर्ययुक्त साक्षाद्ब्रह्मणस्पतीची यथाशास्त्र उपासना करून परम्परया वा साक्षात् ब्रह्मध्यानसिद्धी प्राप्त करून ध्यावी, असें वेदांचें अनुशासन आहे. कारण शिवादिकांच्या ध्यान-सिद्धीनेंच श्रीगणेशोपासनेविषयीं योग्यता प्राप्त होते आणि गणेशोपासनेनें-तो सगुण-निर्गुणाभेद असल्यामुळें-ब्रह्मध्यानसिद्धी होते.

याप्रमाणें गाणेशाद्वैतसिद्धान्ताचें अतिसंग्रहानें पण पूर्णत्वानें वर्णन केलें आहे. गाणपतांमध्येंही दोन भेद आहेत. एक गाणेश व दुसरे गाणेशाद्वैती. जे वरील शब्दार्थ सत्तेनें युक्त असलेलें स्वानन्देश-स्वरूप न जाणतां त्याच्या कार्यरूपाचें म्हणजे आविष्कृत वा सगुण-जें अंतर्यामी-रूपानें सर्व विश्वांत व्याप्त आहे त्या-रूपाचें म्हणजे सगुण-गणेशाचें आराधन करितात ते गाणेश; व वरील गणेशस्वरूपज्ञानानें युक्त होत्साते शांतिसिद्ध्यर्थ जे त्या स्वानन्देशाचें उपासन करितात ते गाणेशाद्वैती होत. याशिवाय सगुण-गणेशाचा कार्यमूर्ति जो भगवान् गुणेश त्याचे उपासक ह्मणजे गणेशाचेच तुरीयत्वानें उपासना करणारे उपासकही गाणपतच होत. एवं गाणपतांत हे तीन भेद आहेत. हे सर्वही अर्थात् वैदिकच होत. यांमध्यें दीक्षित व अदीक्षित असे दोन प्रकार आहेत. गुणेशोपासकांना दीक्षासिद्धी नाहीं. व अदीक्षितांना स्वानन्देश-स्फूर्ति होणें नाहीं. शिवादिकांचें ब्रह्मरूप गुणेशच असल्यामुळें त्यांची उपासना म्हणजे गुणेशोपासनाच होय. अर्थात् त्यांची उपासना ब्रह्मप्राप्तीला साधक होणारी आहे. किंतु शिवादिकांच्या एकेकाच्या उपासनेचें फळ त्यांच्या समष्टीनें युक्त असलेल्या गुणेशाच्या उपासनेच्या फलाबरोबर होणें शक्य नाहीं. म्हणूनच शास्त्रांत उपासनेचे तर-तमप्रकार सांगितले आहेत. जो जो ज्याचा अधिकारी असतो तो तो त्याचाच स्वीकार करतो. या न्यायानें या मार्गानें क्रमशः ब्रह्मसायुज्यान्त सिद्धी होणारी आहे.

या एकंदर विवेचनावरून परमात्मा स्वानन्देश हाच सर्व श्रेष्ठ, सर्वपूज्य व सर्वादिपूज्य असल्याचें सिद्ध झालें आहे. पूर्णसिद्धीकरितां कोणत्याही उपासकाला आरंभीं याचें आराधन करावें लागतें. ब्रह्मसायुज्यसिद्धीला याचेंच आराधन खरें खरें कारण आहे. परंतु चित्तांतील मलांमुळें याच्या उपासनेकडे सर्वांचीच प्रवृत्ती होत नाहीं. एवढ्याकरितां शिवादिदेवांच्या उपासनेची क्रमार्थ प्रवृत्ती आहे. विषयोन्मुख प्राण्यांना अनेक जन्मांच्या पुण्यामुळें वैदिकमार्गाविषयीं श्रद्धा उत्पन्न होते. अशा वैदिकांची प्रथमतः विष्णुभक्तीकडे प्रवृत्ती होतें. कारण विष्णू हा धर्मपालक असल्याचें सांगितलें असल्यामुळें व धर्म हें पुरुषार्थ-सिद्धीचें द्वार असल्यामुळें पापनाशानंतर तिकडेच प्रवृत्ती होणें स्वाभाविक आहे. विष्णूच्या उपासनासिद्धीनंतर देवीच्या आराधनाकडे प्रवृत्ती होऊं लागते. कारण ती कामस्वामिनी असल्यामुळें व मूळचा विषयासक्तीचा अंश कामनारूपानें प्रगट होत असल्यामुळें कामपूरणार्थ ती प्रवृत्तीही सहजच आहे. अशा तऱ्हेनें धर्माला अविरोधक हा कामभोग परिणामी कामना निवर्तक होतो. व परमपुरुषार्थसिद्धीकरितां अर्थाधिपती श्रीशिवाविषयीं प्रेम उत्पन्न होतें. त्यानंतर केवळ मुक्तिरुचि होत्साता अशा क्रमानें आलेला उपासक आत्मरूप व मोक्षप्रद अशा सूर्याची उपासना करूं लागतो. परंतु येथेंही बंधमोक्षात्मक द्वन्द्व पाहून व या चतुष्टयाचें विघ्नाकुलत्वही जाणून तो गणेशोपासनेविषयीं अर्ह झालेला पुरुष गणेशाचीच मोठ्या भक्तीनें उपासना करतो. आणि क्रमानें ब्रह्मयुज्यसिद्धीला प्राप्त होतो. ही क्रमभक्ती होय व ती पंचोपासकांना मुख्यतः उक्त आहे. म्हणजे त्यांनाच तो क्रम प्राप्त होत असतो. याशिवाय इतरांना म्हणजे प्रासादादिभेदानें उपासना करणारांना आपल्या इष्टदेवांच्या कृपेनें श्रेष्ठमार्गाची प्राप्ती होत असते. त्याला 'तत्, तर व तम' अशा संज्ञा आहेत. विष्णुपासून गणेशापर्यंत उपासना श्रैष्ठ्याचें तारतम्य वर आलेलेंच आहे. त्याला अनुसरून वरील क्रमभक्ती म्हणजे 'तत्भक्ती' होय. वैष्णवांना सूर्यभक्ती प्राप्त झाली तर तिला 'तरभक्ती' अशी संज्ञा असून गणेशभक्ती-प्राप्तीला 'तमभक्ती' अशी संज्ञा आहे. असेंच शाक्ताविषयीं जाणावें. शैवांना सौरभक्तिप्राप्ती ही तत्भक्ती असून गणेशभक्तिप्राप्ती ही तरभक्ती होय. हा तारतम्यभाव मंद व तीव्र जिज्ञासु अधिकाऱ्याकरितां मुख्यतः सांगितला आहे. असा हा पूर्ण गाणपत मार्गाचा सिद्धान्त असून त्यांत व

शुद्धाद्वैत सिद्धान्तांत स्वरूपतः भेद नाहीं, म्हणूनच पूर्वाचार्यांनीं इतर पांचही मतांना अवकाश देऊन शुद्धाद्वैताची अर्थात गाणेशाद्वैताची प्रवृत्ती केली.

## अद्वैतस्थापनम्

याप्रमाणें दिग्जय-यात्रा करून श्रीमदाचार्य स्वस्थानीं आल्यानंतर स्वस्थापित मार्गाचें रक्षण करण्याविषयीं सुरेन्द्रपादप्रमुख आपल्या शिष्यांना त्यांनीं आज्ञा केली. त्यावेळीं अद्वैतसिद्धान्ताचा उपदेश करण्याविषयीं त्या शिष्यांनीं प्रार्थना केल्यावरून श्रीमदाचार्य ह्मणाले. ‘चार वेद, इतिहास, पुराण, धर्मशास्त्र दोनही मीमांसा, योगशास्त्र व तन्त्रशास्त्र हीं देहधाऱ्यांच्या आत्मलाभाकरितां साधनें सांगितलीं आहेत ! वेदांच्या अविरोधानें यांचें तात्पर्य ग्रहण करणें याला अद्वैतमार्ग म्हणतात. वेद प्रमाण मुख्य असल्यामुळें त्याला वैदिक असें म्हणतात. तसेंच सर्व ब्रह्मनिष्ठयोग्यांनीं वेदार्थावरून स्मरण करून तोच मार्ग निश्चित केल्यामुळें त्याला स्मार्त असेंही म्हणतात. कर्मकाण्डामध्यें ज्याला स्मार्त अथवा वैदिक मार्ग ह्मणतात त्यालाच ज्ञानकाण्डांत अद्वैत असें ह्मणतात. म्हणजे गाणेश, गाणेशाद्वैत, वैष्णव, वैष्णवाद्वैत; शाक्त, शाक्ताद्वैत; शैव, शैवाद्वैत; सौर, सौराद्वैत; आणि स्मार्त, अथवा हैरण्यगर्भ, शुद्धाद्वैत; मी आतां ज्यांचें निरूपण करीत आहें तें कर्मकाण्डांतील यांच्या स्वरूपाचें होय. कारण कर्मकाण्डांत शुद्धाद्वैताची प्रसक्ती नसून ज्ञानकाण्डांत त्याचें पृथकत्व-भान होत नाहीं. याच्याच पांचही भेदांचें वर्णन मागें अद्वैतस्थापन प्रसंगीं आलेंच आहे. स्वयंज्योतिःस्वरूप जें निर्गुणब्रम्ह त्या पासुन मूळ प्रकृती उत्पन्न झाली. तिच्या ठिकाणीं प्रतिबिंबित झालेलें ब्रह्म सगुणरूप सद्ब्रह्म म्हणून प्रसिद्ध आहे. त्याला गणेश अशी संज्ञा आहे. मूलप्रकृतीपासून माया, अविद्या, आणि तामसी अशा तीन माया निर्माण झाल्या. मायेच्या ठिकाणीं प्रतिबिंबित झालेलें गणेशस्वरूप पुरुष या संज्ञेनें युक्त असून त्यालाच हिरण्यपुरुष अशी संज्ञा आहे. त्या मायेच्या ठिकाणींच सत्व, रज, व तम असे तीन गुण उत्पन्न झाले. मायेमध्यें प्रतिबिंबित झालेलें सगुणब्रह्मच सत्वाश्रयानें शिव, तमोगुणाश्रयानें विष्णू ( या ठिकाणीं कोणास शंका येईल परंतु भगवान् शिव हे अंतःसत्व व बहिस्तम असून विष्णू हे बहिःसत्व व अंतस्तम आहेत. बाह्यगुण हा मायेचा असून अंतर्गुण ब्रह्माचा आहे. येथें ब्रह्मांशाचें वर्णन असल्यामुळें शंकेचें कारण नाहीं. ) रजोगुणाश्रयानें ब्रह्मदेव अशा

संज्ञेनें युक्त झाले. या गुणत्रयगतांचें जोतिरूपच आहे. यांपैकीं ब्रह्मदेव केवल-क्रियामय असून तोच प्रथम शरीरी व जीव आहे. त्याच्या पासूनच सर्व विश्व निर्माण झालें.

एवंच निर्गुणब्रह्मापासून जी मायामय ज्योती उत्पन्न झाली ती सदीक्षणानें दोन प्रकारची झाली. त्यांपैकीं सद्ब्रह्माख्य जी परंज्योती तोच गणेश असून दुसरी शबलज्योती पुरुषात्मक होय. तिला सविता म्हणतात तेंच स्वरूप ज्या वेळीं मायायुक्त म्हणजे परस्पराधीन असतें तेव्हां त्याला शिव अशी संज्ञा येते. तेंच जेव्हां मायामय म्हणजे मायाधीन असतें तेव्हां त्या मायेला शक्ती, व तद्गत मायामय ब्रह्माभासाला नारायण अशी संज्ञा आहे. याप्रमाणें गणेश, पुरुष, परशिव, शक्ती, आणि नारायण हे पांच ब्रह्मरूप व ज्योतिरूप अस-ल्याचें वेदांत सांगितलें आहे. हिरण्यगर्भावस्थेच्या पूर्वी या पांच अवस्था सांगितल्या आहेत. सद्ब्रह्मावस्था पहिली, पुरुषावस्था दुसरी, मायायुक्तावस्था तिसरी, मायामयावस्था चवथी, आणि मायारूपावस्था पांचवी होय. प्रथमाव-स्थेची देवता गणेश, दुसऱ्या अवस्थेची सूर्य, तिसरीची शिव, चवथीची विष्णु, आणि पांचवीची शक्ती होय. या पांचांचेंही वर्णन सगुण, निर्गुण आणि ब्रह्मत्वानें वेदांनीं केलेलें आहे. या पांचांच्या उपास्ति सिद्धीनेंच उपासनासिद्धी व निर्गुणसिद्धि प्राप्त होणारी आहे यांचे उपासना मार्गही स्वतंत्र सांगितले आहेत. तरी आपापल्या अधिकाराप्रमाणें या मार्गांचा आश्रय करून अद्वैत-मार्गाचें रक्षण व स्थापन करा.'

याप्रमाणें उपदेश करून 'शारदादि' चतुर्धाम मठावर सुरेन्द्रादिकांची स्थापना केली. गुर्वाज्ञेप्रमाणें गाणेशपंचार्चनपूर्वक गाणेशाद्वैतरक्षण व वर्धन सुरेन्द्रपादांनीं केलें. पद्मपादादिकांनीं शैवपंचार्चननिष्ठ होऊन शैवद्वैत प्रसृत केलें. हस्तामलकादिकांनीं वैष्णवाद्वैताची प्रवृत्ती केली. दुसरे त्रोटकादि जे होते त्यांनीं शाक्ताद्वैताची प्रवृत्ती केली. आणि आनंदगिरिप्रमुखांनीं सौराद्वै-ताची प्रवृत्ति केली. याप्रमाणें श्रीजगद्गुरु शंकराचार्यांनीं अद्वैतप्रधान षण्मा-र्गांची जी प्रवृत्ति केली तिचेंच रक्षण या सर्वांनीं केलें. तथापि या सर्वांचा शुद्धाद्वैत हाच एक ध्वज असून बाह्यचिन्हांमध्येंहि त्यांनीं गुरुसंप्रदायानुरूप स्मार्तमार्गाचाच अवलंब केला होता. अर्थात् शैवाद्वैतादि मार्गांचा परिपोष व्हावा तसा झाला नाहीं. तथापि श्रीमदाचार्य या षण्मतांचे मूळ प्रवर्तक व युगाचार्य असल्यामुळें त्यांचीं हीं पीठें तत्तत्संप्रदायाच्या उद्धाराला साधक झालीं व होतात.

अनुक्रम ३८८३९ वि: ५१३ ... १२५० ... नोंद दि ११-८-५

मार्गे गाणेशाद्वैत-सिद्धान्त-स्थापन-प्रसंगीं त्यांच्याशीं वाद करावयास आलेले लेण्याद्रिस्थ श्रीगिरिजासुतयोगीन्द्र यांना प्रायश्चितपूर्वक संन्यासदीक्षा गाणेशदीक्षा सर्व संप्रदायांसह देऊन श्रीमयूरेश व गौडपाद यांच्या आज्ञेला अनुसरून त्यांना श्रीभूस्वानंदमयूरेश क्षेत्रस्थ ब्रह्मभूयमहासिद्धि पीठावर स्थापन केलें. व षण्मतोंपास्तिप्रवृत्तीचा अधिकार दिला. याप्रमाणेंच वादांमध्यें जिंकलेल्या परमतकालादि शैवप्रमुखांना त्यांच्या प्रार्थनेवरून वैदिकशैवादि मार्गप्रवृत्ती-करितां त्याच्या त्यांच्या अनादिसिद्ध धर्मपीठांवर त्याची स्थापना केली.

## हैरण्यगर्भ अथवा स्मार्त मत कथन

श्रीमदाचार्यांनीं षण्मताचें स्थापन केलें त्यापैकीं जनतेच्या अधिकारानुरूप प्रामुख्यानें ज्याचा त्यांनीं पुरस्कार केला त्याचा आम्हीं संग्रहानें उल्लेख करीत आहोंत. ज्ञानकांडामध्यें जें शुद्धाद्वैत म्हणून प्रसिद्ध आहे तें सिद्धान्तांत ग्राह्य मानून गणेशादि पंचमूर्ती त्याचींच म्हणजे त्या निर्गुण ब्रह्माचीं कार्यरूपें आहेत, असें जाणून त्यांची समष्टी उपासना करितात, ते हैरण्यगर्भाद्वैती होत. त्याचे उपासनामार्ग स्वतंत्र सांगितले असून त्या क्रमानें त्यांना निर्गुणब्रह्मसिद्धी होते. परंतु वरील प्रकारचें ज्ञान नसून केवळ जगत्कारण परब्रह्म आहे असें मानून जें कोणत्याही देवतेची-देवतोपासन लोकवास देणारें आहे व लोकवास ही मुक्ती नव्हे अशा समजुतीनें-उपासना न करितां जे केवळ कर्मपरायणच असतात त्यांना हैरण्यगर्भ अथवा स्मार्त असें म्हणतात. निरालंब ब्रह्म साक्षात्कार सालंब उपासनेच्या सहायावांचून होणें शक्य नसल्या, मुळें व त्यानीं कोणत्याही उपासनेचा अवलंब केलेला नसल्यामुळें त्यांना अद्वैतसिद्धी कदापि होणें शक्य नाहीं. व त्यांना अद्वैतित्वही नाहींच. कलियुगांतील लोक प्रायः याच अधिकाराचे असल्यामुळें पश्चात्सन्मार्गप्रापक अशा या स्मार्त मार्गाचा प्रचार श्रीमदाचार्यांनीं केला. त्यांचें मुख्य लक्षण म्हणजे कोणत्याही एका देवावर विशेष भक्ति नसणें व आपल्या कार्याकरितां या सर्वांचेंच प्रसंगाविशेष आराधन करणें हें होय. संध्योपासन ही सूर्यपूजा गायत्रीजप हें देव्याराधन, श्रौतस्मार्त अग्निसेवन हें विष्णवर्चन, ब्रह्मयज्ञ ब्रह्मदेवपूजा, वैश्वदेव गणेशपूजा आणि आतिथ्य शिवपूजा, असें मानून ते हैरण्यगर्भमार्गी पंचोपासन करीत असतात. श्रुति स्मृत्यादि ग्रंथांत वर्णिलेल्या कारण स्वरूपाचें ज्यांना ज्ञान नाहीं अशा अज्ञ व कर्मठांकरितांच हा

मार्ग आहे. मात्र क्वचित् मिथ्या ब्रह्म-वादित्वानें हेतूवादक-मूलक अशा आभासमार्गांतही याचें पर्यवसान होण्याचा संभव असतो, तें मात्र अत्यंत अनिष्ट म्हणजे नरक-प्रदच आहे.

## ४ उपसंहार

येणें प्रमाणें पूर्वसंकल्पानुरूप श्रीमदघोररुद्रांश श्रीमदाचार्य परमगुरु श्रीमद्भगवत्पाद योगीन्द्र महाराज यांनीं अद्वैत सिद्धान्त, षडद्वैतमार्ग, षण्मार्गोपास्तिक्रम इत्यादिकांची यथाधिकार स्थापना करून शिष्यादिकांना ग्रंथादिकांचें दान करून त्यांना त्यांच्या रक्षणाविषयीं आज्ञा केली. श्रीमदाचार्यांना श्रीशुकांकडून अद्वैत सिद्धान्त बोधक 'ज्ञानभागवत' संज्ञक कल्पपुराण प्राप्त झालें होतें. तें त्यावेळीं त्यांनीं सर्वत्र प्रस्थापित केलें. एवं आपलें अवतारकृत्य संपवून श्रीमदाचार्यांनीं वयाच्या बत्तिसाव्या वर्षीं स्वस्थानीं कैलासलोकीं गमन केलें. या सर्व सिद्धान्तबोधक श्रीमदाचार्य चरित्राचें पठण जे कोणी परिशीलन पूर्वक करितील ते आचार्य कृपेनें शुद्धज्ञान-निष्ठ व योग्यमार्गस्थित होत्साते पूर्णसिद्धीला पावतील, यांत बिलकुल शंका नाहीं. (यस्य देवे परा भक्तिः०) या श्रुति वाक्यांत श्रीमदाचार्योपासनेचें महत्व व आवश्यकत्व अत्यंत सांगितलें आहे. कोणत्याही स्थितींत व कोणत्याही काळांत हेंच एक ज्ञानप्राप्तीचें खरें खरें साधन आहे. आजची काळस्थिती व श्रीमदाचार्य पीठस्थिति हीं लक्षांत आलीं असतां फारच विषाद वाटतो. श्रीमदाचार्यांसारखे गुरु आणि श्रीरत्नगर्भ गणेशासारखा सर्वसत्ताधीश सर्वस्वतंत्र उपास्यदेव असून ही दैन्यावस्था! श्रीमदाचार्यांनीं या दैन्यनाशाचा उपाय स्वतःच्या चारित्र्यानें स्पष्ट केला असून त्यांच्या कृपासिद्धीकरितां त्यांचें ध्यानमंत्रादि उपासनही शास्त्रांत सांगितलें आहे. पण त्याचा अवलंब केल्याशिवाय फलसिद्धी कशी होणार? श्रीमदाचार्यकृपा या पीठां करवीं ही जागृती करवून आम्हां दीनांवर कधीं वळेल तो सुदीन! आजतर त्यांच्या चरणचिंतनांवाचून दुसरा इलाजच नाहीं. अस्तु याप्रमाणें श्रीगौडपाद योगीन्द्रांनीं ज्या बीजाचा निक्षेप केला त्या बीजाचें वृक्षरूपांत पर्यवसान करून, ज्यांनीं त्याच्या जोपासनेचा कलियुगाचार्य या नात्यानें ब्रह्मभूप महासिद्धिपीठोद्धाररूप योजना करविली त्या परमगुरु श्रीमच्छंकर भगवत्पाद योगीन्द्रमहाराज यांचें सविशेष संग्रहचरित्र पूर्ण झालें.

९४४८३ ॥ श्रीमद्भगवत्पूज्यपादा विजयन्ते ॥